cmyk



दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com **नवी दिशा... नवे विचार.....** email:rajyaloktantra75@gmail.com

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव ● लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक



नवरात्रोत्सवानिमित्त सर्व भाविक-भक्तांना हार्दिक शुभेच्छा !

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–२०४ | गुरूवार दि.१५ ऑक्टोबर २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## माळ पाचवी



पंचमीचे दिवशीं व्रत तें उपांगललिता हो ।
अर्घ्यपाद्यपूजनें तुजला भवानी स्तविती हो ।
रात्रीचे समयीं करिती जागरण हरिकथा हो ।।
आनंदें प्रेम तें आलें सद्भावें क्रीडतां हो ।। ५ ।।
उदो बोला उदो अंबाबाई माउलीचा हो ।
उदोकारें गर्जती काय महिमा वर्णू तिचा हो ।।

## थोडक्यात...

### लडाख भारताचा अविभाज्य भाग–भारत

नवी दिल्लीः लडाखमधील २८ भौगोलिक ठिकाणांचे अधिकृत नामकरण करण्याच्या भारताच्या निर्णयावर चीनने घेतलेला आक्षेप भारताने स्पष्ट शब्दांत फेटाळून लावला आहे. लडाख केंद्रशासित प्रदेश हा भारताचा अविभाज्य भाग असून चीनच्या सततच्या नकाराने हे ऐतिहासिक आणि भौगोलिक सत्य बदलणार नाही, असा ठाम पवित्रा भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने घेतला आहे. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी चीनचा दावा फेटाळला. जयस्वाल म्हणाले, लडाख हा भारताचा एकात्मिक आणि अविभाज्य भाग आहे. चीनने कितीही नकार दिला, तरी हे प्रस्थापित सत्य बदलणार नाही. केंद्रीय गृह मंत्रालयाने 'सर्व्हे ऑफ इंडिया'च्या अधिकृत नकाशावर २८ ठिकाणांची ओळख पटवून त्यांची नावे नोंदवण्याचा निर्णय घेतला होता. स्थानिक प्रशासन व नागरिकांशी चर्चा करूनच ही प्रक्रिया पूर्ण करत त्याचा उद्देश प्रशासकीय सुलभता व जनजागृती वाढवणे असल्याचे स्पष्ट केले. भारताच्या या निर्णयावर प्रतिक्रिया देताना चिनी परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्या माओ निंग यांनी सांगितले की, चीनने लडाख या केंद्रशासित प्रदेशाला कधीही मान्यता दिलेली नाही. भारताने २८ ठिकाणांचे केलेले नामकरण बेकायदेशीर आणि अमान्य असल्याचे चीनने म्हटले.

### निळा ड्रम हत्याकांड : मुस्कान–साहिलला फाशी

मेरठः मेरठमध्ये प्रियकरासोबत मिळून पती सौरभ राजपूतची हत्या करणाऱ्या मुस्कानला फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. तिचा प्रियकर साहिललाही न्यायालयाने फाशीची शिक्षा सुनावली. शिक्षा सुनावण्यापूर्वी तुरुंगात असलेल्या मुस्कान आणि साहिलला व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे जोडण्यात आले. मुस्कान रस्तोगी आणि साहिल ढसाढसा रडू लागले. न्यायाधीशांनी मुस्कानला विचारले, तू तुझा पती सौरभ राजपूतच्या हत्येप्रकरणी दोषी आहेस, तुला कोणती शिक्षा हवी आहे? तिने उत्तर दिले माझ्या मुलींची काळजी घेतली जावी. त्यानंतर ती शांत झाली. यानंतर साहिलला हाच प्रश्न विचारण्यात आला, मात्र तो गप्प राहिला. शिक्षेची घोषणा झाल्यानंतर सौरभच्या आईला अश्रू अनावर झाले. त्या म्हणाल्या, न्याय मिळाला. सौरभ राजपूतची हत्या ३ मार्च २०२५ रोजी झाली होती. मृतदेहाचे ५ तुकडे करून तो निळ्या ड्रममध्ये भरला होता. सौरभचा भाऊ बबलू म्हणाला, आम्हाला न्याय मिळेल अशी आशा होती. सुरुवातीपासूनच आमची एकच मागणी होती, ती म्हणजे फाशीची शिक्षा. शिक्षा सुनावल्यानंतर मुस्कान आणि साहिल दोघेही भावूक झाले आणि त्यांना रडू कोसळले.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.१४ ऑक्टोबर २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ४५.५० क्विंटल | २,६६० | ३,३४५ | ३,००५ |
| ज्वारी/हायब्रिड : ५१.५० क्विंटल | ३,२६० | ६,७०० | ५,१४२ |
| मका/लोकल: १.०० क्विंटल | २,३०० | २,३०० | २,३०० |
| तूर : ९.०० क्विंटल | १०,००० | १०,१०० | १०,००० |
| उडीद : १४.०० क्विंटल | ९,६०० | ९,८५१ | ९,७३७ |
| बाजरी: १४.५० क्विंटल | २,३५० | ३,०९९ | २,७९० |
| मुग: ३.०० क्विंटल | ९,५०० | ९,५०० | ९,५०० |
| सोयाबीन: ३६०.०० क्विंटल | ६,५०० | ७,१९१ | ६,८७० |
| हरभरा: ४.०० क्विंटल | ७,००० | ७,००० | ७,००० |

# संकट वाढले ; आणखी ४० तालुक्यात दुष्काळ जाहीर!

## राज्यातील ३५८ पैकी ३०५ तालुके दुष्काळग्रस्त

मुंबई । प्रतिनिधी

**पावसाने ओढ दिल्यामुळे अनेक भागांतील पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. त्यातच पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर बनू लागला आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने दुष्काळग्रस्त तालुक्यांच्या यादीत आणखी ४० तालुक्यांची भर घातली आहे. त्यामुळे राज्यातील दुष्काळ घोषित करण्यात आलेल्या तालुक्यांची संख्या आता ३०५ झाली आहे.**

नवीन दुष्काळग्रस्त तालुक्यांतील शेतकरी दुष्काळग्रस्त भागांसाठी उपलब्ध असलेल्या सरकारी मदतीसाठी पात्र असतील, असे फडणवीस यांनी मंत्रिमंडळ बैठकीनंतर पत्रकारांना सांगितले. हा निर्णय राज्यातील अनेक भागांत पावसाची तूट आणि शेतीतील संकटाच्या चिंतेदरम्यान आला आहे. विस्तारित यादीमुळे अतिरिक्त तालुक्यांतील शेतकऱ्यांना दुष्काळग्रस्त भागांसाठी सरकारने जाहीर केलेल्या मदत उपायांचा लाभ घेता येईल. गेल्या महिन्यात, पावसाच्या तुटीनंतर राज्य सरकारने २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर



केला होता. त्यानंतर त्यांनी पीक कर्ज पुनर्रचना, जमीन महसूल सवलत आणि वीज बिलांवरील अनुदानासह मदत उपायांची घोषणा केली. आता आणखी ४० तालुक्यांचा ▶▶ पान २ वर

### चारा, बियाणे वाटपासाठी अटी शिथिल

राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर चारा उत्पादनाबाबत राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. चारा उत्पादन कार्यक्रमांतर्गत चारा बियाणे, ठोंबे वाटप योजनेच्या अटी आणि शर्ती शिथिल करण्यास शासनाने मंजुरी दिली आहे. यामुळे अनुदान तत्वावर चारा बियाण्यांसाठी आता वर्षातून एकदाच नव्हे तर एकापेक्षा जास्त वेळा लाभ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच वैयक्तिक लाभासाठी स्वतःचे ३ ते ४ पशुधनाची अटही शिथिल करण्यात आली आहे. याबाबतचा शासन निर्णय पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास विभागाने जारी केला आहे.

# अनिल अंबानींची तब्बल २ हजार कोटींची मालमत्ता जप्त

## ईडीची मोठी कारवाई, परकीय चलनाच्या फेमा कायद्यांतर्गत कारवाई

मुंबई । प्रतिनिधी

**उद्योगपती अनिल अंबानी यांच्या संपत्तीवर ईडीकडून गेल्या वर्षभरापासून कारवाई सुरू आहे. आत्तापर्यंत ९ हजार कोटींची संपत्ती जप्त करण्यात आली आहे. त्यातच, रिलायन्स पॉवर लिमिटेडची भारतातील २,०३२ कोटींची मालमत्ता ईडीकडून जप्त करण्यात आली आहे.**

परकीय चलन व्यवस्थापन कायद्याच्या (फेमा) अंतर्गत ही कारवाई केली. जप्त मालमत्तेत रिलायन्स पॉवरच्या बँक खात्यातील रक्कम आणि सासन पॉवर लिमिटेडमधील भागीदारीचा समावेश आहे. अनिल अंबानी यांनी परदेशात बेकायदेशीररीत्या ठेवलेल्या परकीय चलनाच्या सममूल्याची मालमत्ता ईडीने जप्त केली आहे. सेबीकडून मिळालेल्या माहितीनंतर ईडीचा अधिक तपास सुरू आहे. कंपनीच्या खात्यांमध्ये २,१०१.४६ कोटींच्या राइट–ऑफ आणि तरतुदींची नोंद केली आहे. ब्रिटिश व्हर्जिन आयलंड्स आणि केमन आयलंड्समधील कंपन्यांतील परदेशी गुंतवणूक आणि डव्हान्सच्या व्यवहारांची चौकशी तसेच, २००६ मध्ये रिलायन्स नॅचरल रिसोर्सेस लिमिटेडने परकीय चलन परिवर्तनीय रोख्यांद्वारे ३०० दशलक्ष डॉलर उभारले आहेत. त्यापैकी २७५ दशलक्ष डॉलर सिंगापूरस्थित उपकंपनीत गुंतवण्यात आल्याचा आरोप आहे. या निधीच्या आधारे ब्रिटिश व्हर्जिन आयलंड्स मधील कंपन्यांना कर्ज देण्यात आले. या कंपन्यांचे नियंत्रण भारतातून रिलायन्सच्या अनिल अंबानी समूहाकडून होत असल्याचा ▶▶ पान २ वर

# तिरंगा फडकवणे गुन्हा नाही!

## अभिजीत दीपके यांची १६ ऑक्टोबरला दिल्लीमध्ये आंदोलनाची हाक

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

तिरंगा फडकवणे हा गुन्हा नसून, राष्ट्रध्वज हा देशाचा अभिमान आणि अस्मितेचे प्रतीक आहे. तिरंगा फडकवल्यामुळेच सौरभ दास आणि आशुतोष रांका यांना तुरुंगात डांबण्यात आल्याचा दावा करत कॉकरोच जनता पार्टीचे (सीजेपी) संस्थापक अभिजीत दीपके यांनी आता थेट देशवासीयांना रस्त्यावर उतरण्याचे आवाहन केले आहे. येत्या १६ ऑक्टोबर रोजी दिल्लीतील कनॉट प्लेस येथील सेंट्रल पार्कमध्ये सायंकाळी ५ वाजता तिरंगा घेऊन एकत्र



जमण्याचे आवाहन त्यांनी केले असून, या आंदोलनाच्या माध्यमातून तिरंगा फडकवणे हा गुन्हा नसल्याचा संदेश देशभर पोहोचवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

दीपके यांनी समाजमाध्यमांवरील 'एक्स' या व्यासपीठावर व्हिडिओ पोस्ट करून या आंदोलनाची घोषणा केली.

### देशभरातील नागरिकांना आवाहन

या आंदोलनात सहभागी होण्यासाठी प्रत्येकाने दिल्लीला पोहोचणे शक्य नसते, याची जाणीव ठेवून दीपके यांनी देशभरातील नागरिकांनाही पर्यायी आवाहन केले आहे. जे नागरिक दिल्लीला येऊ शकत नाहीत, त्यांनी आपापल्या शहरात तिरंगा मार्च काढावा, असे त्यांनी म्हटले आहे. स्थानिक पातळीवर तिरंगा घेऊन एकत्र येत राष्ट्रध्वजाचा सन्मान आणि त्यासंबंधीची भूमिका व्यक्त करावी, असा संदेश त्यांनी दिला आहे. दिल्लीतील कार्यक्रमाबरोबरच अन्य शहरांमध्येही तिरंगा मार्च काढला गेल्यास हा मुद्दा राष्ट्रीय पातळीवर चर्चेत येण्याची शक्यता आहे.

# राजू शेट्टी आता कारखाने बंद पाडणार

## साडेपाच हजारांचा हमीभाव न देणाऱ्या कारखान्यातून साखर बाहेर पडू न देण्याचा इशारा

कोल्हापूर । प्रतिनिधी

३१ तास पुणे–बंगळुरू महामार्ग रोखलेल्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी आता आपल्या आंदोलनाची दिशा बदलली आहे. महामार्ग रोखून आंदोलन करण्याचा निर्णय त्यांनी बदलला असून, आता राज्यातील सुरू झालेले कारखाने बंद पाडण्याचा निर्णय घेतला आहे. शेतकऱ्यांना ज्यामुळे त्रास होत आहे त्यांना आता आम्ही त्रास देणार असा इशारा राजू शेट्टी यांनी दिला. राजू शेट्टी यांच्या बदललेल्या



पवित्र्यामुळे शेतकरी संघटना आणि साखर कारखानदार यांच्यामध्ये संघर्ष पेटण्याची चिन्हे आहेत.

उसाला यंदा साडे पाच हजार इतका भाव द्यावा, यासाठी शेतकरी नेते राजू शेट्टी यांनी कोल्हापूर–बेळगावच्या दरम्यान कोगनोळी टोल नाक्यादरम्यान आंदोलन सुरू केले. शेट्टींच्या या आंदोलनामुळे पुणे–बंगळुरू महामार्ग ३१ तास शेतकऱ्यांनी अडवला. असे असले तरी सरकारकडून ▶▶ पान २ वर

# तरुणांना तुरुंगात डांबणे कायरता!

## राहुल गांधींचा सरकारवर निशाणा, जंतर–मंतरवरील आंदोलनाला पाठिंबा

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

जंतर–मंतर येथे सुरू असलेल्या शांततापूर्ण आंदोलनाला काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी बुधवारी पाठिंबा दिला. आंदोलनादरम्यान तिरंगा फडकवणे हा गुन्हा नसल्याचे स्पष्ट करत, असे करणाऱ्या तरुणांना तुरुंगात पाठवणे ही कायरता असल्याची घणाघाती टीका त्यांनी सरकारवर केली. कॉकरोच जनता पार्टीचे (सीजेपी) कार्यकर्ते सौरव दास आणि आशुतोष रांका यांना पाच दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आल्यानंतर राहुल गांधी यांनी ही भूमिका मांडली.



सीजेपीचे सदस्य अजिंक्य शिंदे यांच्या माहितीनुसार, जंतर–मंतरजवळ आंदोलन सुरू असताना सौरव दास आणि आशुतोष रांका यांना ताब्यात घेण्यात आले होते. त्यानंतर त्यांना न्यायालयात हजर ▶▶ पान २ वर

# राज्यात पावसाचा अंदाज; रविवारपर्यंत विविध भागात पावसाला पोषक वातावनण

पुणे । प्रतिनिधी

**राज्यातील काही भागात पुढील ५ दिवस पावसासाठी पोषक हवामान आहे. त्यामुळे तूरळक ठिकाणी वादळी पावसाचा अंदाज आहे. तर कोकणातील काही ठिकाणी उष्णतेच्या लाटेचाही इशारा देण्यात आला आहे.**

पुणे, सातारा, बीड आणि जालना जिल्ह्यात काही ठिकाणी ढगाळ हवामानासह हलक्या पावसाचा अंदाज देण्यात आला आहे. तर शुक्रवारी पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सोलापूर तसेच धाराशिव जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज आहे. तर अहिल्यानगर, लातूर आणि नांदेड जिल्ह्यात ▶▶ पान २ वर

# शासनाकडून अंगणवाडी सेविकांना दिवाळी भेट



## प्रत्येकी दोन हजार रुपयांची देणार भाऊबीज

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील एकात्मिक बालविकास सेवा योजनेअंतर्गत कार्यरत अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना दिवाळीपूर्वीच शासनाकडून भाऊबीज भेट म्हणून प्रत्येकी दोन हजार रुपये देण्यात येणार असल्याची माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली आहे.

राज्यात १,०८,६२७ अंगणवाडी सेविका आणि १,०५,४७० अंगणवाडी मदतनीस आहेत. त्यामुळे, दोन्हीची एकूण पदसंख्या ▶▶ पान २ वर

# वृद्ध, विधवा, दिव्यांग पेन्शन योजनेला ५ वर्षे मुदतवाढ!

## ४०% दिव्यांगतेवरही मिळणार लाभ, केंद्र सरकारचा निर्णय

गदिल्ली । प्रतिनिधी

**ज्येष्ठ नागरिक, विधवा आणि दिव्यांगांना आर्थिक आधार देणाऱ्या राष्ट्रीय सामाजिक सहायता कार्यक्रमाला केंद्र सरकारने आणखी पाच वर्षांची मंजुरी दिली आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने बुधवारी घेतलेल्या निर्णयानुसार ही योजना २०२६–२७ ते २०३०–३१ या कालावधीत सुरू राहणार आहे. यासाठी केंद्र सरकार ५३,४२८ कोटी रुपयांचा खर्च करणार आहे. या निर्णयाचा देशभरातील सुमारे ३.२ कोटी लाभार्थ्यांना फायदा होण्याची अपेक्षा आहे.**



या कार्यक्रमाचे आणि त्याअंतर्गत असलेल्या योजनांचे नाव बदलण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे. तसेच दिव्यांगांना पेन्शन मिळण्याचे नियम सोपे करण्यात येणार आहेत. त्यामुळे आतापेक्षा अधिक दिव्यांग व्यक्तींना या योजनेचा लाभ मिळू शकतो. दिव्यांग पेन्शन योजनेअंतर्गत मिळणाऱ्या आर्थिक मदतीत बदल करण्यास सरकारने मंजुरी दिली ▶▶ पान २ वर

### वृद्ध आणि विधवांच्या पेन्शनमध्ये बदल नाही

ज्येष्ठ नागरिक आणि विधवांसाठीच्या पेन्शन योजना सध्या ज्या पद्धतीने सुरू आहेत, त्याच पद्धतीने पुढेही सुरू राहणार आहेत. या योजनांमधील पेन्शनची रक्कम किंवा पात्रतेच्या नियमांमध्ये सध्या कोणताही बदल करण्यात आलेला नाही. राष्ट्रीय परिवार लाभ योजनाही सुरू राहणार आहे. या योजनेत पात्र गरीब कुटुंबातील कमावत्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यास कुटुंबाला आर्थिक मदत दिली जाते.

### नवे नियम तीन महिन्यांत लागू होणार

दिव्यांग पेन्शनमधील बदल लागू करण्यासाठी केंद्र सरकार पुढील तीन महिन्यांत नवीन मार्गदर्शक सूचना जारी करणार आहे. यामध्ये पेन्शनसाठीच्या अटी, लाभार्थ्यांची संख्या आणि आर्थिक मदतीची माहिती दिली जाईल. त्यानंतर नवीन नियम लागू केले जातील. सरकारच्या माहितीनुसार, या निर्णयाचा देशातील २८ राज्ये आणि ८ केंद्रशासित प्रदेशांमधील सुमारे ३.२ कोटी लाभार्थ्यांना फायदा होणार आहे.

cmyk

## अग्रलेख

# माहितीच्या अधिकाराचा गळा घोटणारी लालफीतशाही!

लोकशाहीत सत्ता जनतेच्या नावाने चालते; मग सत्तेच्या कारभाराचा हिशेब जनतेला विचारता येऊ नये, अशी व्यवस्था कशासाठी? सरकारी निर्णय, सार्वजनिक निधीचा विनियोग, प्रशासकीय अनियमितता आणि लोकहिताच्या योजनांची अंमलबजावणी याबाबत प्रश्न विचारण्याचा अधिकार नागरिकांना देणारा माहितीचा अधिकार (आरटीआय) हा भारतीय लोकशाहीतील अत्यंत महत्त्वाचा कायदा आहे. २००५ मध्ये अस्तित्वात आलेल्या या कायद्याने सामान्य नागरिकांच्या हातात सत्तेला जाब विचारण्याचे प्रभावी साधन दिले. मात्र, या अधिकाराची अंमलबजावणी करणारी यंत्रणाच नागरिकांसाठी अडथळा ठरू लागली, तर पारदर्शकतेच्या आश्वासनाचे करायचे काय? माहिती मिळवण्याचा अधिकार कागदावर जिवंत आणि प्रत्यक्षात निष्प्रभ, अशी स्थिती निर्माण होणे हा केवळ प्रशासकीय दोष नाही; तो लोकशाहीच्या उत्तरदायित्वासमोरील गंभीर प्रश्न आहे.

माहिती आयोगांच्या कामकाजाबाबत समोर आलेली आकडेवारी या व्यवस्थेतील त्रुटींवर बोट ठेवते. केंद्रीय माहिती आयोगाकडून १४ हजार ६०३ आणि महाराष्ट्र राज्य माहिती आयोगाकडून १४ हजार १४० प्रकरणे अर्जांतील तांत्रिक त्रुटींमुळे परत पाठवण्यात आल्याची आकडेवारी संबंधित अहवालाच्या संदर्भात नमूद करण्यात आली आहे. पानांना क्रमांक नसणे, अर्ज ठरावीक नमुन्यात नसणे किंवा अन्य प्रक्रियात्मक त्रुटी यांसारख्या कारणांमुळे नागरिकांना पुन्हा अर्ज करण्याची वेळ येत असेल, तर ही प्रक्रिया नेमकी कोणाच्या सोयीसाठी आहे? अर्जातील त्रुटी दूर करण्याची संधी देण्याऐवजी अर्ज परत पाठवणे हा पारदर्शकतेचा मार्ग कसा ठरू शकतो? अर्थात, प्रत्येक अर्जातील त्रुटी दुर्लक्षित करावी, असा याचा अर्थ नाही. मात्र, नियमांचा उद्देश माहिती मिळवण्याची प्रक्रिया सुलभ करणे हा असला पाहिजे; नागरिकांना दारातच रोखणे हा नव्हे. सामाजिक कार्यकर्त्या अंजली भारद्वाज यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांचा गाभाही हाच आहे. माहिती आयोग हे नागरिकांच्या अधिकारांचे संरक्षक आहेत की प्रशासकीय प्रक्रियेच्या नावाखाली माहिती मिळवण्याच्या मार्गातील आणखी एक अडथळा? एखादा सामान्य नागरिक भ्रष्टाचार किंवा सार्वजनिक निधीच्या गैरवापराबाबत माहिती मागतो, तेव्हा त्याच्याकडे कायद्याचे सखोल ज्ञान, तांत्रिक कौशल्य किंवा कायदेशीर मदतीची साधने असतीलच असे नाही. अशा वेळी प्रशासनाने त्याला प्रक्रिया समजावून सांगणे आणि त्रुटी सुधारण्याची संधी देणे अपेक्षित आहे. पण तांत्रिक कारणांचा अडसर उभा राहिला, तर माहिती मागणाऱ्यालाच दोषी ठरवण्याची वेळ येते. ही स्थिती बदलल्याशिवाय माहितीच्या अधिकाराचा खरा लाभ शेवटच्या नागरिकापर्यंत पोहोचणार नाही. या व्यवस्थेतील दुसरी गंभीर समस्या म्हणजे अपिलांच्या निकालासाठी लागणारा विलंब. त्रिपुरा आणि मध्य प्रदेशसारख्या राज्यांमध्ये काही अपिलांच्या निकालासाठी सुमारे २० वर्षे प्रतीक्षा करावी लागत असल्याचे संबंधित अहवालात नमूद असेल, तर त्या आकडेवारीची अधिकृत पडताळणी आणि तिचा संदर्भ तपासणे आवश्यक आहे. मात्र, प्रतीक्षेचा कालावधी कितीही असला, तरी माहितीच्या अधिकारातील विलंबाचे गांभीर्य नाकारता येत नाही. आज एखाद्या रस्त्याच्या कामातील अनियमिततेची माहिती हवी असेल, तर वीस वर्षांनंतर मिळणाऱ्या उत्तराचा उपयोग काय? एखाद्या लाभार्थ्याला योजनेतील अन्यायकारक निर्णयाविरुद्ध दाद मागायची असेल, तर वर्षानुवर्षे प्रलंबित असलेले अपील त्याला न्याय देऊ शकते का? माहितीचा उपयोग अनेकदा वेळेशी जोडलेला असतो. वेळ निघून गेल्यानंतर मिळालेली माहिती कायदेशीर किंवा ऐतिहासिक दृष्टीने महत्त्वाची असू शकते; पण तातडीचा अन्याय दूर करण्याची तिची क्षमता कमी होऊ शकते.

माहितीचा अधिकार कायद्यात जनमाहिती अधिकाऱ्यांसाठी माहिती देण्याची मुदत निश्चित केली आहे. सामान्यतः अर्ज प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांत माहिती देणे अपेक्षित असते; जीवन किंवा स्वातंत्र्याशी संबंधित प्रकरणांत ४८ तासांची तरतूद आहे. तरीही माहिती न मिळाल्यामुळे नागरिकांना प्रथम अपील आणि त्यानंतर द्वितीय अपील करावे लागते. अपिलांचा निपटारा वेळेत होत नसेल, तर कायद्यातील मुदतींचा प्रत्यक्ष उपयोग काय? नागरिकांना माहिती न देणाऱ्या अधिकाऱ्यांना दंडाची तरतूद असतानाही तिची प्रभावी अंमलबजावणी होत नसेल, तर कायद्याचा धाक निर्माण होणार कसा? दंड हा सूडाचा उपाय नसून कायदेशीर जबाबदारीची जाणीव करून देणारे साधन आहे. जाणीवपूर्वक विलंब, विनाकारण नकार किंवा कायद्याचे उल्लंघन झाल्यास संबंधित प्रकरणातील तथ्ये तपासून दंडात्मक तरतुदींचा वापर झाला पाहिजे. माहिती आयोगांतील रिक्त पदे हीदेखील चिंतेची बाब आहे. आयोगांकडे पुरेसे आयुक्त नसतील, कर्मचारी अपुरे असतील आणि प्रलंबित प्रकरणांचा डोंगर वाढत असेल, तर निकालाचा वेग मंदावणारच. कमोडोर लोकेश बत्रा यांच्यासारख्या माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी या प्रश्नावर सातत्याने लक्ष वेधले आहे. आयुक्तांची पदे वेळेवर न भरण्यामागे पारदर्शकतेपासून दूर राहण्याची राजकीय इच्छा आहे का, असा संशय उपस्थित होऊ शकतो; मात्र, असा हेतू सिद्ध करण्यासाठी ठोस पुरावे आवश्यक आहेत. तरीही पदे रिक्त ठेवण्याचे परिणाम स्पष्ट आहेत–नागरिकांची प्रतीक्षा वाढते, अपिलांचा निपटारा लांबतो आणि माहिती मिळण्याचा घटनात्मक लोकशाहीतील महत्त्वाचा आधार कमकुवत होतो. सरकार कोणतेही असो, माहिती आयोग सक्षम ठेवण्याची जबाबदारी सत्ताधाऱ्यांचीच आहे. यावर उपायही स्पष्ट आहेत. पहिला उपाय म्हणजे माहिती आयोगांच्या अर्जप्रक्रियेचे सुलभीकरण. अर्जात किरकोळ त्रुटी आढळल्यास अर्जदाराला डिजिटल माध्यमातून त्या सुधारण्याची संधी द्यावी. अर्जाची स्थिती, सुनावणीची तारीख आणि निर्णय यांची माहिती ऑनलाइन उपलब्ध करून द्यावी. दुसरा उपाय म्हणजे आयोगांतील रिक्त पदे भरण्यासाठी पारदर्शक आणि कालबद्ध प्रक्रिया निश्चित करणे. नियुक्त्या वेळेत झाल्या नाहीत, तर त्याची कारणे सार्वजनिक केली पाहिजेत. तिसरा उपाय म्हणजे प्रलंबित अपिलांचा कालावधी कमी करण्यासाठी आयोगनिहाय उद्दिष्टे, नियमित आढावा आणि पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध करून देणे. चौथा उपाय म्हणजे माहिती अधिकार कायद्यातील कलम ४ ची प्रभावी अंमलबजावणी. कलम ४ नुसार सरकारी कार्यालयांनी महत्त्वाची माहिती स्वतःहून सार्वजनिक करणे अपेक्षित आहे. विभागांची रचना, अधिकारी–कर्मचाऱ्यांच्या जबाबदाऱ्या, निर्णयप्रक्रिया, अर्थसंकल्प, खर्च, अनुदाने, निविदा आणि योजनांच्या अंमलबजावणीसंबंधी माहिती नियमितपणे अद्ययावत करून ऑनलाइन उपलब्ध केली, तर नागरिकांना प्रत्येक बाबीसाठी स्वतंत्र अर्ज करण्याची गरज कमी होईल. स्वयंस्फूर्त माहितीप्रकटीकरण हे प्रशासनावरील अविश्वास कमी करण्याचे आणि अपिलांचा भार घटवण्याचे प्रभावी साधन ठरू शकते.

सरकारने माहिती आयोगांना सक्षम करणे, रिक्त पदे भरणे, अपिलांचा वेळेत निपटारा करणे आणि कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर योग्य कारवाई करणे याला प्राधान्य दिले पाहिजे. अन्यथा माहिती मागणारा नागरिक वर्षानुवर्षे दार ठोठावत राहील आणि उत्तरदायित्वाची जबाबदारी असलेली यंत्रणा मात्र शांत बसेल. लोकशाहीत प्रश्न विचारण्याचा अधिकार देणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच त्या प्रश्नांना वेळेत उत्तर मिळणेही महत्त्वाचे आहे. माहितीचा अधिकार कायद्यात आहे; आता तो प्रशासनाच्या व्यवहारात उतरवण्याची वेळ आली आहे. कारण माहितीविना पारदर्शकता नाही, पारदर्शकतेविना उत्तरदायित्व नाही आणि उत्तरदायित्वाविना लोकशाही केवळ नावापुरती उरते.

## पान १ वरून...

### संकट वाढले ; आणखी ४०

समावेश झाल्याने, एकूण दुष्काळग्रस्त तालुक्यांची संख्या ३०५ वर पोहोचली आहे. कमी पावसामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांवरील आर्थिक भार कमी करणे हा सरकारच्या मदतीचा उद्देश आहे. शेतकऱ्यांना मिळणारे विशिष्ट लाभ लागू असलेल्या मदत उपायांवर आणि पात्रता निकषांवर अवलंबून असतील. आता एकूण बाधित तालुक्यांची संख्या राज्यातील ३५८ पैकी ३०५ वर पोहोचली आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी सांगितले.

-------------

### तिरंगा फडकवणे

देशातील नागरिकांनी मोठ्या संख्येने या आवाहनाला प्रतिसाद द्यावा आणि हातात तिरंगा घेऊन सेंट्रल पार्कमध्ये उपस्थित राहावे, असे त्यांनी म्हटले आहे. राष्ट्रध्वजाबद्दलचा सन्मान व्यक्त करणे आणि तिरंगा फडकवण्याच्या अधिकाराविषयी जनजागृती करणे, हा या उपक्रमामागील उद्देश असल्याचे त्यांच्या आवाहनातून स्पष्ट होते. सौरभ दास आणि आशुतोष रांका यांना तिरंगा फडकवल्यामुळेच तुरुंगात पाठवण्यात आल्याचा दावा अभिजीत दीपके यांनी केला आहे. या प्रकरणाचा संदर्भ देत त्यांनी तिरंगा फडकवण्याच्या कृतीला गुन्ह्याचे स्वरूप दिले जाऊ नये, अशी भूमिका मांडली. देशाचा राष्ट्रध्वज फडकवणे हा गुन्हा नसल्याचा मुद्दा ठळकपणे मांडण्यासाठी नागरिकांनी एकत्र येणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे. दीपके यांच्या मते, राष्ट्रध्वज हा केवळ कापडाचा तुकडा नसून देशाची एकता, स्वाभिमान आणि राष्ट्रीय भावना यांचे प्रतीक आहे. त्यामुळे तिरंगा हातात घेऊन शांततेच्या मार्गाने एकत्र येणे आणि आपली भूमिका मांडणे, हा संदेश या आंदोलनातून देण्याचा प्रयत्न आहे. मात्र, सौरभ दास आणि आशुतोष रांका यांच्या अटकेमागील नेमकी कारणे आणि संबंधित प्रकरणातील कायदेशीर बाबी स्वतंत्रपणे पडताळणे आवश्यक आहे. या आंदोलनाची घोषणा करताना अभिजीत दीपके यांनी स्वतःलाही तुरुंगात जावे लागू शकते, अशी शक्यता व्यक्त केली आहे. मात्र, त्याची मला चिंता नाही, अशी भूमिका त्यांनी मांडल्याचे व्हिडिओतून समोर आले आहे. त्यांच्या या वक्तव्यामुळे आंदोलनाबाबतची चर्चा अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. त्यांच्या या भूमिकेला नागरिकांकडून कसा प्रतिसाद मिळतो आणि १६ ऑक्टोबर रोजी दिल्लीतील सेंट्रल पार्कमध्ये किती लोक सहभागी होतात, याकडे लक्ष लागले आहे.

---------------

### अनिल अंबानींची तब्बल २

आरोप असल्याने ईडीकडून तपास सुरू आहे. दरम्यान, यापूर्वी देखील अनिल अंबानी यांच्यावर ईडीने कारवाई करत त्यांची मोठी संपत्ती जप्त केली आहे. अनिल अंबानी यांच्या रिलायन्स ग्रुपवर ईडीकडून नोव्हेंबर २०२५ मध्ये कारवाई करण्यात आली होती. तेव्हा आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी ईडीने ग्रुपशी संबंधित १४०० कोटी रुपयांची संपत्ती जप्त केली. यापूर्वीच ईडीने अनिल अंबानी यांची एकूण ९००० कोटींपेक्षा जास्त रुपयांची संपत्ती जप्त केली आहे.

--------

### तरुणांना तुरुंगात डांबणे

करण्यात आले आणि पाच दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली. या कारवाईच्या पार्श्वभूमीवर राहुल गांधी यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर पोस्ट करत आंदोलनकर्त्यांच्या बाजूने भूमिका घेतली. राहुल गांधी यांनी आपल्या पोस्टमध्ये शांततापूर्ण आंदोलनात तिरंगा फडकवण्याच्या कृतीवरून तरुणांना तुरुंगात पाठवण्याच्या कारवाईवर प्रश्न उपस्थित केला. तिरंगा हा देशाच्या अस्मितेचे आणि राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक असून, तो फडकवणे हा गुन्हा ठरू शकत नाही, असे मत त्यांनी व्यक्त केले. आंदोलनकर्त्यांवर झालेल्या कारवाईवरून त्यांनी सरकारच्या भूमिकेवरही टीका केली. विद्यार्थी, तरुण, पत्रकार आणि 'इंडिया' आघाडीतील घटक पक्षांचे झेंडे व बॅनर वेगवेगळे असले, तरी नागरिकांना संविधानाने दिलेल्या अधिकारांची मागणी करणे हा सर्वांचा समान उद्देश असल्याचे राहुल गांधी यांनी म्हटले. लोकशाही व्यवस्थेत शांततापूर्ण आंदोलन आणि आपल्या मागण्या मांडण्याच्या अधिकाराचा मुद्दा त्यांनी अधोरेखित केला. सीजेपी कार्यकर्त्यांच्या अटकेनंतर राहुल गांधी यांनी आंदोलनाला दिलेला पाठिंबा हा या प्रकरणाला मिळालेला महत्त्वाचा राजकीय प्रतिसाद मानला जात आहे. या भूमिकेमुळे आंदोलनाचा मुद्दा केवळ संबंधित कार्यकर्त्यांच्या अटकेपुरता मर्यादित न राहता, शांततापूर्ण आंदोलनाचा अधिकार, अभिव्यक्तिस्वातंत्र्य आणि संविधानिक हक्कांच्या चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. राहुल गांधी यांच्या विधानानंतर या प्रकरणावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये राजकीय वाद अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.

-----------

### राजू शेट्टी आता कारखाने

आपल्याला हवा तसा प्रतिसाद मिळत नाही, असे राजू शेट्टी म्हणाले. त्यामुळे त्यांनी आता राज्यातील सुरू झालेले साखर कारखाने बंद पाडण्याचा निर्णय घेतला आहे. उसाला साडे पाच हजारांचा हमीभाव जाहीर न करता जे कारखाने सुरू झाले आहेत ते बंद पाडू, एक कणही साखर कारखान्यातून बाहेर जाऊ देणार नाही, असा पवित्रा राजू शेट्टी यांनी घेतला आहे. अशाही परिस्थितीत जर कारखाना कुणी सुरू केला तर त्या कारखान्यातील साखर आम्ही गरिबांना वाटून टाकणार, अशी भूमिका राजू शेट्टी यांनी घेतली. आपली भूमिका जाहीर करताना राजू शेट्टी म्हणाले की, गेल्या ३१ तासांपासून रस्त्यावर बसलो आहोत तरीही सरकार लक्ष देत नाही. त्यामुळे ज्यांच्यामुळे शेतकऱ्यांना हा त्रास होतोय त्यांना नीट करणे गरजेचे आहे. आम्ही इकडे आंदोलनासाठी बसलोय, पण भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांनी तिकडे काही कारखाने सुरू केले आहेत. त्यामुळे दोन पथके तयार केली आहेत. हे आंदोलन सुरू होण्यापूर्वी महाराष्ट्रातील प्रमुख कारखानदारांना भेटून मी विनंती केली होती. गेल्या सात वर्षांमध्ये त्यांना एफआरपी वाढवून घेता आली नाही. नोव्हेंबरमध्ये गाळप केल्यास रिकव्हरी चांगली होईल आणि त्यातून शेतकऱ्यांचाही फायदा होईल. परंतु दिवाळीच्या तोंडावर साखरेची किंमत वाढल्याने सरकारने कारखान्यांवर दबाव आणून ते सुरू करायला लावले आहेत.

-------------

### शासनाकडून अंगणवाडी

२,१४,०९७ एवढी कार्यरत आहे. या सर्व कार्यरत अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना प्रत्येकी दोन हजार रुपये भाऊबीज भेट देण्यात येणार आहे. त्यासाठी ४२ कोटी ८१ लाख ९४ हजार रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली हा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील गर्भवती महिला, स्तनदा माता आणि बालकांच्या पोषणाची काळजी घेणाऱ्या अंगणवाडी सेविका व मदतनीस यांची दिवाळी गोड व्हावी, हा या निर्णयामागील उद्देश असल्याचे तटकरे यांनी सांगितले.

------------

### राज्यात पावसाचा अंदाज; रविवारपर्यंत

काही ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. शनिवारी पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर तसेच मराठवाड्यातील धाराशिव, लातूर आणि नांदेड जिल्ह्यासह कोकणातील ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधूदूर्ग जिल्ह्यातही काही ठिकाणी विजा आणि ढगांच्या गडगडाटासह हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. अहिल्यानगर, बीड, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यात काही ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता व्यक्त केली आहे. रविवारी पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर तसेच मराठवाड्यातील धाराशिव, लातूर, नांदेड, हिंगोली जिल्ह्यात काही ठिकाणी वादळी पावसाचा अंदाज आहे. तसेच विदर्भातील वाशीम, यवतमाळ, वर्धा, नागपूर, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यातही काही ठिकाणी विजा आणि ढगांच्या गडगडाटासह वादळी पावसाचा अंदाज देण्यात आला आहे. अहिल्यानगर, बीड, परभणी, ठाणे, रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यातही काही ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. राज्यातील काही भागात रत्नागिरी, रायगड आणि मुंबई जिल्ह्यात काही ठिकाणी उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे.

------------

### वृद्ध, विधवा, दिव्यांग पेन्शन योजनेला

आहे. नव्या नियमानुसार ७९ वर्षांपर्यंतच्या दिव्यांग लाभार्थ्यांना ३७५ रुपये, तर ८० वर्षे आणि त्यापेक्षा जास्त वयाच्या लाभार्थ्यांना ६२५ रुपये मिळणार आहेत. पेन्शनसाठी आवश्यक असलेल्या दिव्यांगतेच्या प्रमाणातही मोठा बदल करण्यात आला आहे. सध्या या योजनेचा लाभ घेण्यासाठी किमान ८० टक्के दिव्यांगता असणे आवश्यक आहे. आता ही मर्यादा ४० टक्क्यांपर्यंत कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. म्हणजेच, ४० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त दिव्यांगता असलेल्या व्यक्तींनाही ठरावीक अटी पूर्ण केल्यास पेन्शनचा लाभ घेता येणार आहे. याशिवाय, पेन्शनसाठी असलेली किमान वयोमर्यादाही बदलण्यात येणार आहे. नव्या नियमांनुसार जन्मापासूनच पात्रता मिळू शकते. त्यामुळे दिव्यांग मुलांनाही या योजनेच्या कक्षेत आणता येणार आहे. दरम्यान, केंद्र सरकारने राष्ट्रीय सामाजिक सहायता कार्यक्रमाचे नाव बदलून 'प्रधानमंत्री सामाजिक सहायता योजना' करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याअंतर्गत असलेल्या चार योजनांची नावेही बदलण्यात येणार आहेत.

## पान ६ वरून...

### दिंद्रुडच्या वैद्यकीय अधिकाऱ्याचा

आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी पदाचा कार्यभार तातडीने काढून घेतला आहे. तसेच, त्यांच्याविरुद्ध 'महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९' मधील तरतुदींनुसार कठोर शिस्तभंगविषयक कारवाई करण्याचा प्रस्ताव लातूर परिमंडळाचे आरोग्य सेवा उपसंचालक यांच्यामार्फत मुंबई येथील आरोग्य सेवा आयुक्तांकडे तत्काळ सादर करण्यात आला आहे. शासन स्तरावरून या प्रकरणी पुढील आदेश प्राप्त होईपर्यंत डॉ. निलेश ढाकणे यांचे मुख्यालय आता 'आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, बीड' येथेच निश्चित करण्यात आले आहे. जिल्ह्यातील कोणत्याही आरोग्य संस्थेमध्ये रुग्णसेवेत कसलाही हलगर्जीपणा अजिबात खपवून घेतला जाणार नाही, अशी अत्यंत स्पष्ट भूमिका आणि सज्जड इशारा जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागामार्फत या धडक कारवाईतून देण्यात आला आहे.

--------------

### महावितरणच्या निष्काळजीपणामुळे

पीक पाण्याअभावी पूर्णपणे जळून खाक झाले आहे. यामुळे सुमारे ४ लाख रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे. तसेच ५ लहान गाई, ५ म्हशी, २ बैल आणि २ लहान वासरे अशा जनावरांच्या पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. महावितरणच्या या बेफिकिरीमुळे झालेल्या सोयाबीन पिकाच्या नुकसानीची भरपाई देण्यात यावी. तसेच, पडलेले विजेचे पोल तातडीने उभे करून वीज जोडणी देऊन वीज पंप पूर्ववत सुरू करण्यात यावा, अशी आग्रही मागणी तहसीलदारांकडे सादर केलेल्या अर्जाद्वारे करण्यात आली आहे. एम एस सी बी चे .शेख इंजिनियर यांना विचारणा केली असता त्यांनी या बाबत एक सेपरेट निधी असतो त्याच्यावर एक एजन्सी असते निधी वापस गेला आहेस आम्हाला त्याचे अधिकार नाहीत असे त्यांनी प्रतिक्रियांमध्ये सांगितले शेतकऱ्यांना स्वतःने पैसे भरून हे पोल उभा करावी लागते असे त्यांनी सांगितले

-----------------

### ऊसतोड मजुरांच्या बालकांचे शैक्षणिक नुकसान

अंमलबजावणी करून जिल्ह्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळेल, याची खात्री करावी आणि योजनेची १०० टक्के अंमलबजावणी करण्यात यावी. सन २०२५–२६ या शैक्षणिक वर्षात बीड जिल्ह्यातून कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यांतील साखर कारखान्यांच्या कार्यक्षेत्रात अंदाजे ४० ते ५० हजार कुटुंबांचे हंगामी स्थलांतर होते. या कुटुंबांसोबत अंदाजे एक ते दीड लाख बालकेही स्थलांतरित होतात. अवनि संस्थेने मागील वर्षी केलेल्या सर्वेक्षणामध्ये ७ ते १४ वयोगटातील ९५६ बालके स्थलांतरित झाल्याचे आढळून आले. त्यापैकी ६८० बालकांना अवनि संस्थेच्या माध्यमातून शाळेत दाखल करण्यात आले. मात्र, या बालकांकडे शिक्षण हमी कार्ड उपलब्ध नसल्यामुळे त्यांना शाळेत प्रवेश मिळवून देताना अनेक अडचणींचा सामना करावा लागला. यंदा बीड जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे ऊसतोड मजुरांचे स्थलांतर वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे स्थलांतरित होणाऱ्या बालकांच्या शिक्षणात खंड पडू नये, त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात कायम ठेवता यावे आणि बालमजुरीच्या समस्येला आळा घालता यावा, यासाठी बीड जिल्हा प्रशासनाने पुढील उपाययोजना तातडीने कराव्यात, अशी मागणी पत्रकार परिषदेत करण्यात आली. या पत्रकार परिषदेला अनुराधा भोसले (अध्यक्ष, अवनि संस्था), अशोक तांगडे (अध्यक्ष, जागर प्रतिष्ठान), तत्त्वशील कांबळे (अध्यक्ष, राजर्षी छत्रपती शाहू प्रतिष्ठान बीड ) साताप्पा मोहिते आणि अमर कांबळे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

--------------

### कृष्णा गायकवाड तीन जिल्ह्यांतून

त्याच्या वर्तनात कोणतीही सुधारणा झाली नव्हती. नागरिकांची सुरक्षितता आणि परिसरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी बीडचे पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली अंभोरा पोलिसांनी त्याला तीन जिल्ह्यांतून हद्दपार करण्याचा प्रस्ताव सक्षम प्राधिकाऱ्यांकडे सादर केला होता. या प्रस्तावाची कायदेशीर पडताळणी व चौकशी पूर्ण झाल्यानंतर उपविभागीय दंडाधिकाऱ्यांनी कृष्णा गायकवाड यास बीड, अहिल्यानगर आणि धाराशिव या तिन्ही जिल्ह्यांच्या हद्दीतून २ वर्षांच्या कालावधीसाठी हद्दपार करण्याचे आदेश दिले आहेत.

**कडक कारवाईचा इशारा**

अंभोरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत कोणत्याही प्रकारची गुन्हेगारी, दहशत अथवा अवैध कृत्ये खपवून घेतली जाणार नाहीत. कायदा हातात घेणाऱ्यांवर आणि सर्वसामान्य जनतेला वेठीस धरणाऱ्या समाजकंटकांवर अशीच कठोर कारवाई सुरूच राहील, असा सज्जड इशारा पोलीस प्रशासनाने दिला आहे.

------------

### बीडमध्ये शिवाजीनगर पोलिसांची चक्री जुगार

दिली होती. संबंधितांनी आपापसात संगनमत करून आर्थिक फायद्यासाठी हा जुगार चालवला असल्याचे तपासात उघड झाले आहे. या प्रकरणी शेख अफान शेख करीम (वय २५ वर्ष, रा. अजिजपुरा, बीड) व शेख अवेज शेख शफीक (वय २४ वर्ष, रा. गौसनगर, बीड) यांच्यासह घरमालक अमन मेहबूब शेख व आयडी उपलब्ध करून देणारा शेख करीम शेख सलीम यांच्या भूमिकेबाबत फिर्यादीत नोंद करण्यात आली आहे. याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. क्र. ३२९/२०२६, महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्याच्या कलम ४ व ५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख व उपविभागीय पोलीस अधिकारी राजीव नवले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ, पोलीस जमादार माने, नितीन भोंडवे, राजाभाऊ जाधव आणि श्रीहरी तरटे यांच्या पथकाने पार पाडली. शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध जुगार, मटका व इतर बेकायदेशीर धंद्यांविरुद्ध यापुढेही अशीच कठोर कारवाई सुरू राहील, असा इशारा पोलिसांनी दिला आहे.

-------------

### माहिती न देणाऱ्या महासांगवीच्या

होते. मात्र, उत्तरवादी असलेले जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी श्री. राख व्ही. एस. हे सुनावणीस गैरहजर राहिले. ग्रामपंचायत अधिकारी अनुपस्थित राहिल्याने, प्रथम अपिलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी (गट–अ), पंचायत समिती पाटोदा यांनी या प्रकरणाचा निकाल देत आदेश पारित केला आहे. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांनी आवश्यक ते शुल्क भरल्यानंतर पुढील ७ दिवसांच्या आत नियमानुसार उपलब्ध करून द्यावी, असे स्पष्ट निर्देश जन माहिती अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. तसेच या निर्णयाने अपिलार्थींचे समाधान न झाल्यास, त्यांना कलम १९(१) नुसार मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ छत्रपती संभाजी नगर यांच्याकडे ९० दिवसांच्या आत द्वितीय अपिल करण्याची मुभा असल्याचेही या आदेशात नमूद करण्यात आले आहे.

--------------

### आष्टी, पाटोदा, शिरूर कासारच्या

बैठक घेण्याचे आश्वासन जलसंपदामंत्र्यांनी दिल्याचे धोंडे यांनी सांगितले. त्यानंतर धोंडे यांनी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन दुष्काळग्रस्त गावांतील पाणीटंचाई, पशुधनासाठी चारा आणि शेतमजुरांच्या रोजगाराचा प्रश्न मांडला. गावांना नियमित पाणीपुरवठा करावा, पशुधनासाठी थेट चारा अनुदान द्यावे आणि महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत मजुरांना कामे उपलब्ध करून द्यावीत, अशी मागणी त्यांनी केली. आष्टी, पाटोदा आणि शिरूर कासार तालुक्यांतील दुष्काळग्रस्त गावांमध्ये नियमित पाणीपुरवठा करावा, पशुधनासाठी थेट चारा अनुदान द्यावे आणि महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत मजुरांना कामे उपलब्ध करून द्यावीत, अशी मागणी भीमराव धोंडे यांनी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली. या उपाययोजनांमुळे दुष्काळग्रस्त शेतकरी, पशुपालक आणि शेतमजुरांना दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

-----------------

### मुख्यमंत्री साहेब पाच हजारात

हाती भोपळा दिला शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या घोषणेचा जाहीर निषेध करण्यात येत आहे. दिवाळीला शेतकऱ्यांच्या घरी लेकी–बाळी ,नातवंड घरी येतात शेतकऱ्यांनी दिवाळी कशी साजरी करावी? लेकी– बाळी नातवंड यांना काय करून खाऊ घालावं पाच हजारात दिवाळीचा किराणा सुद्धा होणार नाही शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा जाहीर निषेध करण्यात येत आहे.

---------------

### देवदूत प्रतिष्ठानच्या गौरी–गणपती

तर तृतीय क्रमांक सौ.रत्नमाला तुकाराम जोशी यांनी पटकाविला आहे. तसेच सौ.आरती ऋषिकेश मसुरे, सौ.रुक्मिणी तेजस शिंदे, सौ.पुनम महेश सुरवसे, सौ.दिपाली रंजीत धस, सौ.सीमा किसन महागोविंद या पाच स्पर्धकांना उत्तेजनार्थ बक्षीस जाहीर झाले आहे. स्पर्धेतील प्रथम क्रमांकाच्या विजेत्याला आकर्षक फ्रिज, द्वितीय क्रमांक विजेत्याला कुलर आणि तृतीय क्रमांकाच्या विजेत्याला मिक्सर हे बक्षीस देण्यात येणार आहे. तर उत्तेजनार्थ विजेत्यांना प्रत्येकी डिनर सेट देऊन गौरविण्यात येणार आहे. आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ ओमप्रकाश शेटे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली देवदूत प्रतिष्ठानने ही स्पर्धा केवळ सजावट म्हणून न घेता, एक सांस्कृतिक चळवळ म्हणून घेतली होती. सदरील स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा हा अत्यंत शानदार पद्धतीने होणार आहे. शुक्रवार दि. १६ ऑक्टोबर २०२६ रोजी किल्ले धारूर येथील गरड मंगल कार्यालयात आयोजित 'होम मिनिस्टर – खेळ पैठणीचा' या विशेष कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते सर्व विजेत्या महिलांना बक्षीस वितरण करण्यात येणार आहे. तरी सर्व स्पर्धक आणि महिला भगिनींनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन देवदूत प्रतिष्ठानच्यावतीने करण्यात आले आहे.

घराघरात गणपती–गौरी उत्सवात महिलांनी केलेल्या मेहनतीला सन्मान मिळावा, पर्यावरणपूरक आणि पारंपरिक सजावटीला प्रोत्साहन मिळावे आणि महिलांमध्ये एकोपा व आनंदी वातावरण निर्माण व्हावे हा मुख्य उद्देश होता. स्पर्धेसाठी सजावटीतील कल्पकता व नावीन्य, पारंपरिकतेचे जतन, पर्यावरणपूरक साहित्याचा वापर, स्वच्छता व मांडणीचे सौंदर्य, सामाजिक संदेश आणि एकूणच सादरीकरण या निकषांवर परीक्षकांनी अत्यंत बारकाईने परीक्षण करून हा अंतिम निकाल दिला आहे.

– सौ. शिल्पा ओमप्रकाश शेटे

--------------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरूवार दि.१५ ऑक्टोबर २०२६


## १६ ऑक्टोबरला रंगणार 'झक्कास दांडिया'चा जल्लोष!

बीड। प्रतिनिधी
नवरात्र महोत्सवाच्या उत्साहाला चार चाँद लावण्यासाठी बीड शहरात 'झक्कास दांडिया' महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. ड्रीमलँड इव्हेंट मॅनेजमेंटच्या वतीने तसेच रविराज आबा जेधे यांच्या आयोजनातून हा भव्य दांडिया महोत्सव गुरुवार, दि. १६ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता सिंहगड लॉन्स, कॅनॉल रोड, बीड येथे रंगणार आहे.

या महोत्सवात प्रसिद्ध डीजे मेघा यांच्या संगीताच्या तालावर दांडियाचा उत्साह अनुभवता येणार असून, मराठी कलाकार निखिल निगडे, अभिनेत्री दिव्या शेट्टी आणि निवेदिका निशा कुचेकर यांच्या विशेष उपस्थितीमुळे कार्यक्रमाची रंगत वाढणार आहे. आकर्षक संगीत, दांडियाचा ठेका आणि उत्सवी वातावरण यांचा संगम या सोहळ्यात अनुभवायला मिळणार आहे. नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमातून बीडकरांना मनोरंजनाची अनोखी पर्वणी मिळणार आहे. तरुणाईसह दांडियाप्रेमींमध्ये या महोत्सवाबाबत उत्सुकता निर्माण होण्याची अपेक्षा आहे. कार्यक्रमाचा तपशील कार्यक्रम : झक्कास दांडिया महोत्सव दिनांक : १६ ऑक्टोबर २०२६ वेळ : सायंकाळी ५.३० वाजता स्थळ : सिंहगड लॉन्स, कॅनॉल रोड, बीड आयोजक : ड्रीमलँड इव्हेंट मॅनेजमेंट आयोजन : रविराज आबा जेधे करत आहे

# जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकाचा गुन्हेगारांना दणका

## दोन सराईत गुंडांवर 'एमपीडीए' अंतर्गत कारवाई

बीड । प्रतिनिधी
बीड शहरात गुन्हेगारी कारवाया करून कायदा व सुव्यवस्थेला बाधा निर्माण करणाऱ्या दोन सराईत व धोकादायक गुंडांवर जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी विवेक जॉन्सन आणि पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी कडक कारवाईचा बडगा उचलला आहे. अक्षय रंगनाथ साखरे (वय ३१, रा. अंकुशनगर, बीड) आणि भिमा लक्ष्मण मस्के (वय ३९, रा. बलभीमनगर, बीड) या दोघांवर 'एमपीडीए' कायद्यान्वये स्थानबद्धतेची कारवाई करत त्यांची छत्रपती संभाजीनगर येथील हर्सूल मध्यवर्ती कारागृहात रवानगी करण्यात आली आहे.

पोलीस निरीक्षक बीड शहर यांनी पोलीस अधीक्षकांमार्फत अंकुशनगर येथील अक्षय रंगनाथ साखरे याच्याविरुद्ध 'धोकादायक व्यक्ती' या संवर्गाखाली एमपीडीएचा प्रस्ताव सादर केला होता. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी १३ ऑक्टोबर २०२६ रोजी या प्रस्तावास मंजुरी दिली. त्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेने



(स्थागुशा) त्यास ताब्यात घेऊन शिवाजीनगर पोलीस ठाण्यात हजर केले. तेथून पोलीस पथकाने त्याची हर्सूल कारागृहात रवानगी केली. अक्षय साखरेविरुद्ध दुखापत करणे, तोडफोड करून नुकसान करणे, जातीवाचक शिवीगाळ करणे व जीवे मारण्याच्या धमक्या देणे यांसारखे ५ गंभीर गुन्हे दाखल आहेत. यापूर्वी त्याच्यावर प्रतिबंधक कारवाई करण्यात आली होती; मात्र तो त्या कारवाईला जुमानत नसल्याचे स्पष्ट झाले. दुसऱ्या कारवाईमध्ये, पेठ बीड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांनी बलभीमनगर येथील भिमा लक्ष्मण मस्के याच्याविरुद्ध पोलीस अधीक्षकांमार्फत एमपीडीए प्रस्ताव पाठवला होता.

### अवैध धंदे, गुंडगिरी करणाऱ्यांवर 'मोक्का' आणि 'एमपीडीए' लावणार – पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत

''जिल्ह्यात वाळूची अवैध तस्करी, गुटखा विक्री, धार्मिक वा जातीय तेढ निर्माण करणारे समाजकंटक, दादागिरी व खंडणी उकळणारे गुंड, तसेच अवैध जुगार, लॉटरी आणि हातभट्टी दारू चालवणाऱ्यांवर यापुढेही कठोर 'एमपीडीए' व 'मोक्का' अंतर्गत कारवाई केली जाईल,'' असा कडक इशारा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी दिला आहे.

जिल्हाधिकाऱ्यांच्या मंजुरीनंतर पेठ बीड पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन हर्सूल कारागृहात स्थानबद्ध केले. भिमा मस्केविरुद्ध बेकायदेशीर मंडळी जमवून जीवे मारण्याचा प्रयत्न करणे, दगडफेक, घरफोडी, रस्ता अडवून जबरी चोरी करणे, हद्दपारी आदेशाचे उल्लंघन, सदोष मनुष्यवधाचा प्रयत्न, लोकसेवकावर हल्ला आणि दुखापत करणे असे तब्बल ९ गंभीर गुन्हे दाखल आहेत. प्रतिबंधक कारवाया करूनही त्याच्या गुन्हेगारी कारवाया सुरूच होत्या. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत (भा.पो.से.), अप्पर पोलीस अधीक्षक समीर शेख, उपविभागीय पोलीस अधिकारी राजीव नवले, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यामध्ये पोलीस निरीक्षक शीतलकूमार बल्लाळ, निलेश केळे, सपोनि सतीश पंडित, प्रीतमकुमार पुजारी, पोलीस अंमलदार विलास कांदे, राजूभाऊ जाधव, सुभाष मोई, नितीन राठोड, अनिल भालेराव, अमृत पाटोळे, परझने, गुजर, गिरी, सानप (सर्व पेठ बीड व शिवाजीनगर पोलीस ठाणे) तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोउपनि श्रीराम खटावकर, मनोज परझने, अश्पाक सय्यद, बबन सलगर, अंकुश वरपे, नितीन वडमारे, सपोउपनि अभिमन्यू औताडे व बिभीषण चव्हाण यांनी सहभाग घेतला.

## आ. सुरेश धस यांच्या पुढाकाराने कंत्राटी वीज कामगारांच्या थकीत वेतनाचा प्रश्न मार्गी

### जयदत्त धस यांच्या माध्यमातून पाठपुरावा; कंत्राटी कामगारांकडून आभार व्यक्त



आष्टी । प्रतिनिधी
आष्टी महावितरण उपविभागांतर्गत विविध पदांवर कार्यरत असलेल्या कंत्राटी वीज कामगारांचे मागील दोन महिन्यांपासून वेतन रखडल्याने त्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत होता. कुटुंबाचा उदरनिर्वाह, घरखर्च आणि दैनंदिन गरजा भागवताना कामगारांना अडचणी येत होत्या. या गंभीर प्रश्नाची दखल घेत आमदार सुरेश आण्णा धस यांच्या पुढाकाराने थकीत वेतनाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी पाठपुरावा करण्यात आला. कंत्राटी वीज कामगारांच्या वतीने तांत्रिक कामगार संघटनेचे अध्यक्ष मनोज निबाळकर यांनी युवक नेते जयदत्त भैय्या धस यांच्याकडे वेतन रखडल्याची समस्या मांडली. कामगारांची अडचण लक्षात घेऊन जयदत्त भैय्या धस यांनी तातडीने आमदार सुरेश आण्णा धस यांच्याशी संपर्क साधत हा प्रश्न त्यांच्या निदर्शनास आणून दिला.

यानंतर आमदार सुरेश धस यांनी महावितरणच्या मानव संसाधन (एच.आर.) विभागाशी तसेच बीड येथील कार्यकारी अभियंत्यांशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधला. कंत्राटी कामगारांचे दोन महिन्यांपासून रखडलेले वेतन लवकरात लवकर अदा करण्यात यावे, यासाठी त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा केला. त्यांच्या हस्तक्षेपामुळे वेतनाच्या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी हालचालींना गती मिळाली. कंत्राटी वीज कामगारांच्या वेतनाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी पुढाकार घेतल्याबद्दल कामगारांनी आमदार सुरेश आण्णा धस आणि युवक नेते जयदत्त भैय्या धस यांचे आभार व्यक्त केले. तसेच कर्मचाऱ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असलेले तांत्रिक कामगार संघटनेचे पदाधिकारी विठ्ठल अण्णा शेंबडे, प्रशांत दादा पोकळे, अमृत राजे आजबे आणि ज्येष्ठ नेते भाऊसाहेब निंबाळकर काका यांच्यासह या कामासाठी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या सर्व पदाधिकारी व कर्मचाऱ्यांप्रति कंत्राटी कामगारांनी कृतज्ञता व्यक्त केली. कंत्राटी वीज कामगारांच्या वेतनाचा प्रश्न ऐरणीवर आल्यानंतर लोकप्रतिनिधी आणि संघटनेच्या माध्यमातून झालेल्या पाठपुराव्यामुळे कामगारांच्या अडचणी प्रशासनापर्यंत पोहोचल्या. त्यामुळे रखडलेल्या वेतनाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी झालेल्या प्रयत्नांबाबत कामगारांनी समाधान व्यक्त केले.

## वैधकिन्ही टोलनाक्यावर हायव्होल्टेज ड्रामा: कागदपत्रे मागताच कर्मचारी फरार

### शिवसेना (उबाठा) उपनेत्या सुषमा अंधारे यांचा प्रशासनावर घणाघाती आरोप

पाटोदा । प्रतिनिधी
पाटोदा तालुक्यातील वैद्यकिन्ही येथील टोलनाक्यावर एखाद्या हिंदी चित्रपटाला शोभेल असा हायव्होल्टेज ड्रामा पाहायला मिळाला. या टोलनाक्यावर होत असलेल्या वसुलीच्या वैधतेवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी थेट सवाल उपस्थित केले आहेत. कागदपत्रांची पडताळणी सुरू करताच टोल कर्मचारी आणि व्यवस्थापकाने काढता पाय घेतल्याने या वसुलीमागे मोठे रॅकेट असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

नेमका काय घडला प्रकार? पुण्याच्या दिशेने प्रवास करत असताना सुषमा अंधारे यांनी वैद्यकिन्ही येथील टोलनाक्यावर आपली गाडी थांबवून अचानक पाहणी केली. त्यांनी तेथे उपस्थित कर्मचाऱ्यांकडे टोल वसुलीची अधिकृत परवानगी आणि कागदपत्रांची मागणी केली. मात्र, कर्मचाऱ्यांना एकही अधिकृत दस्तऐवज दाखवता आला नाही. त्यामुळे हा टोलनाका शासकीय नियमांना धाब्यावर बसवून सुरू आहे का, असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केला.

पोलिसांचा नाव काढताच कर्मचाऱ्यांची पळता भुई थोडी! टोल वसुलीबाबत संशय बळावल्यानंतर अंधारे यांनी या प्रकाराची माहिती स्थानिक पोलिसांना देण्याच्या हालचाली सुरू केल्या. पोलीस ठाण्यात तक्रार होणार असल्याचे समजताच, तेथील व्यवस्थापकासह कर्मचाऱ्यांनी टोलनाका सोडून पळ काढला. गेली अनेक वर्षे या मार्गावर सर्रास टोल वसुली सुरू असताना स्थानिक प्रशासन आणि संबंधित यंत्रणा अनभिज्ञ कशी, असा थेट सवाल अंधारे यांनी केला आहे. आमदार सुरेश धसांची तत्काळ मध्यस्थी, प्रशासकीय यंत्रणा घटनास्थळी घटनेचे गांभीर्य लक्षात घेत सुषमा अंधारे यांनी स्थानिक आमदार सुरेश धस यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधला.

आमदार धस यांनी घटनेची दखल घेत नायब तहसीलदार आणि महसूल अधिकाऱ्यांना तातडीने घटनास्थळी चौकशीसाठी पाठवले. प्राथमिक माहितीनुसार, या टोलनाक्याचे कंत्राट 'आश्मी रोड करियर्स प्रायव्हेट लिमिटेड' या कंपनीकडे असून, ३ कोटी ५८ लाख रुपयांचे टेंडर काढण्यात आल्याचे समजते.

मात्र, टेंडरची रक्कम भरली असली तरी प्रत्यक्षात वसुलीसाठी लागणारे करारपत्र, शासकीय परवानग्या आणि नियमावली पूर्ण आहे का? हा आता तपासाचा विषय ठरला आहे. वर्षानुवर्षे वाहनधारकांच्या खिशावर डल्ला मारणाऱ्या या टोलनाक्याचे नेमके सत्य काय? यात प्रशासन आणि कंत्राटदारांचे काही साटेलोटे आहे का? या सर्व प्रश्नांची उत्तरे आता महसूल आणि पोलीस प्रशासनाच्या सखोल चौकशीनंतरच समोर येणार आहेत.

## माहेश्वरी महिला मंडळातर्फे मूक-बधिर विद्यार्थ्यांना अन्नदान व शालेय साहित्याचे वाटप

माजलगाव। प्रतिनिधी
पितृपक्षानिमित्त माहेश्वरी महिला मंडळ, माजलगाव यांच्या वतीने जनारथ शिक्षण प्रसारक मंडळ, येळंब (घाट), ता. जि. बीड संचलित मूक-बधिर निवासी विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी अन्नदान व शालेय साहित्य वाटपाचा उपक्रम उत्साहात राबविण्यात आला.

समाजातील गरजू व वंचित घटकांना मदतीचा हात देऊन सामाजिक बांधिलकी जपण्याच्या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला. विद्यार्थ्यांना अन्नदानासोबतच शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि



हास्य फुलले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद हेच या सामाजिक कार्याचे खरे यश असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

हा सेवाभावी उपक्रम यशस्वी करण्यासाठी माहेश्वरी महिला मंडळातील अनेक महिलांनी सहकार्य केले.

यावेळी महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ. अलकनंदा मानधने, उपाध्यक्षा सौ. वर्षा बजाज, सचिव सौ. अनिता मुंदडा, सहसचिव श्रीमती सुगना तेला, कोषाध्यक्षा सौ. सुरेखा जेथली, सहकोषाध्यक्षा सौ. किरण कासट, संघटनमंत्री सौ. रत्नमाला इंदानी, श्रीमती कृष्णा मालानी यांच्यासह विद्यालयातील शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते. सेवा, सहकार्य आणि सामाजिक संवेदनशीलतेचा संदेश देणारा हा उपक्रम उपस्थितांसाठी समाधान आणि आनंद देणारा ठरला.

## इकरा पब्लिक स्कूल, माजलगाव येथे पालक-शिक्षक सभेचे उत्साहात आयोजन

माजलगाव। प्रतिनिधी
इकरा पब्लिक स्कूल, माजलगाव येथे नर्सरी, एल.के.जी., यू.के.जी. तसेच इतर वर्गांच्या विद्यार्थ्यांसाठी पालक-शिक्षक सभेचे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले. या सभेला पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या सभेदरम्यान शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे निकालपत्र पालकांना दाखवून त्यांच्या शैक्षणिक प्रगतीची सविस्तर माहिती दिली. तसेच निकालपत्रावर पालकांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आल्या. विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता, अभ्यासातील प्रगती आणि वर्तनातील सुधारणा यांविषयीही पालकांशी चर्चा करण्यात आली.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक शेख तौसीफ सर यांनी उपस्थित पालकांना मोलाचे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी पालक आणि शिक्षक यांच्यात समन्वय असणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. मुलांच्या शिक्षणाकडे नियमित लक्ष द्यावे, त्यांचा गृहपाठ वेळेवर पूर्ण करून घ्यावा, मुलांना नियमित शाळेत पाठवावे तसेच त्यांच्यामध्ये शिस्त, स्वच्छता आणि अभ्यासाची आवड निर्माण करावी, असे आवाहन त्यांनी पालकांना केले. याशिवाय विद्यार्थ्यांनी स्वच्छ गणवेशात शाळेत यावे, नियमित उपस्थित राहावे आणि शाळेतील नियमांचे पालन करावे, यासाठी पालकांनी विशेष लक्ष द्यावे, असे शिक्षकांनी सांगितले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा आणि पालक यांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. या पालक-शिक्षक सभेमुळे पालक आणि शिक्षक यांच्यात सुसंवाद निर्माण झाला. पालकांनी सभेत सक्रिय सहभाग नोंदवून शाळेच्या उपक्रमांना सकारात्मक प्रतिसाद दिला.

## घाटनांदूर एसबीआय शाखेत शेतकरी पीककर्ज लवकर वाटप करण्याची मागणी-राजकमल देशमुख

घाटनांदूर। प्रतिनिधी
घाटनांदूर येथील स्टेट बँक ऑफ इंडिया (एसबीआय) शाखेत शेतकऱ्यांना पीककर्ज वाटप करण्याबाबत पारदर्शकता आणावी, तसेच पात्र शेतकऱ्यांना पीककर्ज वाटपाबाबत स्पष्ट खुलासा करावा, अशी मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरद पवार गटाचे राजकमल देशमुख यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते अतुल जाधव, दादा वैद्य, कमलाकर मिसाळ,सचिन देशमुख, विनोद जाधव यांनी शाखा व्यवस्थापकांकडे निवेदनाद्वारे केली आहे.शेतकऱ्यांना खरीप व रब्बी हंगामात पेरणी, खते, औषधे, बियाणे आणि इतर शेतीविषयक खर्चासाठी पैशांची आवश्यकता असते. अशा परिस्थितीत पात्र शेतकऱ्यांना वेळेत पीककर्ज उपलब्ध होणे आवश्यक आहे. मात्र, शेतकऱ्यांना पीककर्ज वाटपात अडचणी येत असल्याच्या पार्श्वभूमीवर संबंधित एसबीआय बँकेला मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

तसेच, पात्र शेतकऱ्यांना पीककर्ज लवकरात लवकर वाटपाची प्रक्रिया पारदर्शक ठेवावी आणि शेतकऱ्यांच्या तक्रारींचे तातडीने निराकरण करावे, अशी विनंती करण्यात आली आहे.याशिवाय, बँकेत येणाऱ्या शेतकरी व पेन्शनधारक ज्येष्ठ नागरिकांना वारंवार त्रास सहन करावा लागू नये, यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. पेन्शनधारकांच्या पासबुकमध्ये पेन्शन जमा झाल्याची नोंद करण्यासाठी एंट्री प्रिंटची सुविधा नियमितपणे उपलब्ध करून द्यावी, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे.शेतकरी व ज्येष्ठ नागरिकांच्या अडचणी लक्षात घेऊन बँक प्रशासनाने या मागण्यांवर सकारात्मक विचार करून पुढील प्रक्रिया लवकरात लवकर करण्यात यावी व तसेच एसबीआय शाखेतील कर्मचारी श्रीमंतांना तातडीने न्याय व सर्व सामान्य नागरिकांना तासंतास ताटकळत रांगेत उभे राहावे लागत आहे हे सर्वसामान्यांना वेगळा न्याय घाटनांदुर एसबीआय शाखेच्या कर्मचाऱ्याकडून होत असल्याने वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लवकरात लवकर याची दखल घेऊन सर्व खातेधारकांना समान न्याय देण्यात यावा असे सांगण्यात आले

# युसूफवडगावात १८ वर्षांपासून जपली जातेय शारदीय नवरात्र महोत्सवाची अखंड परंपरा!

## कै.भैय्या गुरव उर्फ दत्तात्रय क्षीरसागर यांनी घातला उत्सवाचा पाया

युसूफवडगाव। प्रतिनिधी
केज तालुक्यातील युसूफवडगाव येथे जय तुळजाभवानी मित्र मंडळाच्या वतीने गेल्या १८ वर्षांपासून शारदीय नवरात्र महोत्सवाची परंपरा मोठ्या श्रद्धेने आणि भक्तिभावाने जपली जात आहे. देवीच्या मूर्तीची स्थापना करून सुरू झालेला हा धार्मिक उत्सव आज गावातील भाविकांच्या श्रद्धेचे आणि एकोप्याचे प्रतीक बनला आहे. या महोत्सवाची सुरुवात १८ वर्षांपूर्वी कै.भैय्या गुरव उर्फ दत्तात्रय क्षीरसागर यांनी जय तुळजाभवानी मित्र मंडळाची स्थापना करून केली. या धार्मिक उपक्रमाला विनोद उजगरे, बालाजी गव्हाणे, सोमनाथ डिकुळे,प्रवीण क्षीरसागर,अनिल पौल, राम लोंढे आणि शंकर गव्हाणे यांनी मोलाचे सहकार्य केले. या सर्वांच्या प्रयत्नांतून उत्सवाचा पाया



रचला गेला आणि त्यानंतर दरवर्षी ही परंपरा अखंडपणे सुरू आहे.

या महोत्सवाचे खास वैशिष्ट्य म्हणजे घटस्थापनेच्या एक दिवस अगोदर श्री क्षेत्र तुळजापूर येथे जाऊन तुळजाभवानी मातेचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले जातात.

मंदिरात अखंड ज्योत प्रज्वलित करून ही ज्योत धावत येरमाळा मार्गे युसूफवडगावात आणली जाते. त्यानंतर मांडवात घटस्थापना करून विधिवत भवानी मातेच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात येते. या धार्मिक विधीमुळे उत्सवाला विशेष महत्त्व प्राप्त होते. नवरात्र महोत्सवाच्या नऊ दिवसांत वाघ्या-मुरळी तसेच विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. या काळात भाविक मोठ्या श्रद्धेने देवीच्या दर्शनासाठी येतात. धार्मिक वातावरण, भक्तिभाव आणि सामूहिक सहभाग यांमुळे गावात उत्साहाचे वातावरण निर्माण होते.विसर्जन मिरवणुकीऐवजी महाप्रसादाची परंपरा या महोत्सवाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे पौर्णिमेच्या दिवशी कोणत्याही प्रकारची विसर्जन मिरवणूक न काढता सर्व भाविक भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन केले जाते. महाप्रसादानंतर या शारदीय नवरात्र महोत्सवाची सांगता होते. गेल्या १८ वर्षांपासून धार्मिक श्रद्धा, सामाजिक एकोपा आणि परंपरेची जपणूक करत जय तुळजाभवानी मित्र मंडळाने हा उत्सव अविरत सुरू ठेवला आहे. कै.भैय्या गुरव उर्फ दत्तात्रय क्षीरसागर यांनी सुरू केलेल्या या उपक्रमाची परंपरा आजही कायम असून, श्रद्धा आणि सामूहिक प्रयत्नांच्या बळावर युसूफवडगावातील जय तुळजाभवानी मित्र मंडळाच्या शारदीय नवरात्र महोत्सवाने आपले वेगळेपण जपले आहे.

## राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेत जि. प शाळेतील कृष्णा साळुंकेचा सुवर्णवेध!

बीड। प्रतिनिधी
नाशिक येथे 'स्विमिंग फेडरेशन ऑफ इंडिया'तर्फे आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेत बीडच्या कु. कृष्णा अमोल साळुंके हिने सुवर्णपदक पटकावून दैदिप्यमान यश संपादन केले आहे. तिने जलतरणातील 'ब्रेस्ट स्ट्रोक' या प्रकारात अप्रतिम कामगिरी करत हे सुवर्णपदक आपल्या नावावर केले. कु. कृष्णा ही अवघ्या पहिलीच्या वर्गात शिकत असून ती जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, आंबिलवडगाव (मराठी शाळा) येथील विद्यार्थिनी आहे. ती बीड येथील चंपावती क्रीडा संकुलात जलतरणाचे नियमित प्रशिक्षण घेत आहे.

तिच्या या यशासाठी प्रशिक्षक श्री. राहुल सर, श्री. प्रधान सर, रोहन सर, दिपक सर तसेच श्री. तोडले सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. प्राथमिक शाळेतील पहिलीच्या विद्यार्थिनीने राज्यस्तरावर मिळवलेल्या या घवघवीत



यशामुळे सर्वत्र तिचे कौतुक होत आहे. या यशाबद्दल आंबिलवडगावचे सरपंच, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, सर्व सदस्य, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद व ग्रामस्थांनी कृष्णाचे अभिनंदन करून तिच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# कोंबड्यांना मानमोडी रोगापासून वाचवा!

ऑक्टोबर हीटमध्ये कोंबड्यांमध्ये मानमोडी रोगाचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असते. हा रोग कोणत्याही वयाच्या कोंबडीला होऊ शकतो. परंतु लहान पिल्लांना याचा धोका सर्वाधिक असतो. प्रादुर्भाव झाल्यास कोंबड्यांची मोठ्या प्रमाणात मरतुक होते. तसेच ज्या कोंबड्या आजारातून बऱ्या होतात, त्या अंडी देणे बंद करतात. त्याचा थेट परिणाम उत्पादनावर आणि उत्पन्नावर होतो. त्यामुळे मानमोडीबद्दल पशुपालकांमध्ये जागरुकता वाढून योग्य वेळी लसीकरण करणे गरजेचे आहे.

मानमोडी आजार हा लेंटोजेनिक, मेसोजेनिक, व्हेलोजेनिक या तीन विषाणूंपासून पसरणारा रोग आहे. विषाणू कोंबड्यांच्या वेगवेगळ्या अवयवांवर परिणाम करतात. ज्या मानमोडी रोगात कोंबड्यांना श्वास घेताना त्रास होतो, अंड्यांच्या उत्पादनात घट येते, त्या कोंबड्यांना लेंटोजेनिक विषाणूचा प्रादुर्भाव होतो. मेसोजेनिक विषाणूमुळे कोंबड्यांना हिरवी हगवण लागते. पंख, पाय लुळे पडतात आणि मान वाकडी होते. तसेच ज्या कोंबड्यांमध्ये रक्ताची हवगण होते आणि कोंबड्यांना श्वासोच्छास अत्यंत त्रास होत असेल तर तो व्हेलोजेनिक विषाणूचा प्रादुर्भाव समजू शकतो. मानमोडी म्हणजेच राणीखेत रोगाचा प्रसार हवेच्या माध्यमातून होतो. कोंबड्यांच्या विष्ठेवाटे, श्वासावाटे हे विशाणू वातावरणात मिसळतात, आणि शेडचे वातावरण दुषित होते. हे विषाणू वातावरणात तब्बल ६ महिने



राहतात. तसेच शेडमधील खाण्या पिण्याची भांडीसुद्धा दुषित होतात. याशिवाय शेडमध्ये काम करणाऱ्या व्यक्तीचे कपडे, बुट या गोष्टी दुषित होऊनही आजाराच प्रसार होतो. माणसांसोबत कुत्रे, मांजर यांच्यातूनही आजाराचा प्रसार एका शेडमधून दुसऱ्या शेडमध्ये होतो. ज्या कोंबड्यांची आजारामुळे मरतुक होते त्यांची योग्य प्रकारे विल्हेवाट न लावण्यामुळेही रोगाचा प्रसार होतो. या रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास पिले ठसकतात, त्यांच्या नाकातून पाणी येते. चोच उघडी ठेवून ते श्वास घेतात आणि त्यांच्या श्वासाचाही आवाज येतो. प्रादुर्भावानंतर कोंबड्या सुस्त राहतात.एका ठिकाणी कोपऱ्यात गर्दी करुन उभ्या राहतात. त्यांची विष्ठा पांढरी पाण्यासारखी दिसू लागते. तसेच विषाणूचा प्रादुर्भाव मज्जासंस्थेवर झाला तर कोंबड्यांना चालताही येत नाही. त्या थरथर कापतात कर काही वेळा लंगडतात. मोठ्या कोंबड्यामध्येही श्वास घेताना त्रास होतो आणि आवाज येतो. कळपातील कोंबड्या एकाएकी आजारी पडतात. कोंबड्यांना पाण्यासारखी संडास होते. त्यांच्या विष्ठेचा रंग हिरवट आणि खडूसारखा होतो. अंडी देण्याचे प्रमाण अचानक कमी होते. अंड्याचे कवच मऊ होते आणि त्यांचा आकार बदलतो. तसेच अंड्यातील पांढरा बलक पाण्यासारखा पातळ होतो. मानमोडी रोगाचा प्राद्रुभाव झालाय हे कसे ओळखावे यासाठी काही उपाय आहे. लहान आणि मोठ्या कोंबड्यांमध्ये लक्षणं दिसताय का हे तपासावे. तसेच ज्या कोंबड्यांची मरतुक झाली, ती का झाली हे तपासावे. कोंबड्यांच्या आतल्या कातडीवर रक्त जमा झालेले दिसून येते. मानमोडी रोगासाठी खात्रीशीर उपचार अजूनही आलेला नाही. हा आजार होऊ नये म्हणून पशुवैद्यकाच्या मार्गदर्शनाखाली अँटिबायोटिक्सचा वापर करावा. तसेच उपचार नसल्याने लसीकणाद्वारेच रोगाचा प्रतिबंध करुन घ्यायचा आहे. त्यासाठी लासोटा ही लस ५ ते ७ दिवस वयाच्या पिल्लांना द्यावी. ही लस देताना पिलांना नाकात एक थेंब टाकून द्यावा. तर मुलेश्वर किंवा आरटुबी या लस इंजेक्शनद्वारे पंखातून द्यावी. याशिवाय शेडमध्ये स्वच्छता ठेवावी. आजाराने मरतुक झालेल्या कोंबड्या जाळून नष्ट कराव्या. तसेच बाहेरच्या व्यक्तींना फार्मवर प्रवेश देऊ नये. आजाराचे निदान झाल्यावर कोंबड्या वेगळ्या कराव्यात. त्यांच्या खाद्य-पाण्याची व्यवस्था वेगळी करावी.

# मक्याच्या दाण्यांपासून करा चारा निर्मिती!



यंदा जून महिन्यात अपेक्षित पाऊस झाला नाही. आता सद्या पावसाची मोठी तूट आहे. हिरवा चारा उपलब्ध होत असल्याने चाऱ्याचा प्रश्न काहीसा मिटला आहे. परंतु दुभत्या जनावरांना हिरवा चारा चरण्यासाठी बाहेर नेता येत नाही. हिरव्या चाऱ्याला पर्याय म्हणून ग्रामीण भागातील काही पशुपालक या मक्याचे दाणे भिजवून हायड्रोपोनिक पद्धतीने चारा निर्मिती करण्यास प्राधान्य देत आहेत. चारा टंचाईवर मात करण्यासाठी ग्रामीण भागातील महिलांकडून हायड्रोपोनिक पद्धतीने चारा निर्मितीचे तंत्र अवलंबिले जाते.

कशी करायची चारा निर्मिती? काही ठिकाणी तयार केलेल्या चारा पद्धतीनुसार, मक्याच्या दाण्यांना २४ तास भिजत ठेवा. २४ तासानंतर हे दाणे गोणपाटात काढून घेतल्यानंतर त्याला मोड येतात. यानंतर मोड आलेले मक्याचे दाणे घरात सात ते आठ मातीच्या मोठ्या टोपल्या आणि प्लास्टिक ट्रे यात माती टाकून पेरून ठेवा. एका ठिकाणी ४०० ग्रॅम मका पेरून त्याला दररोज दर दोन तासाने पाणी द्यावे, यातून एका आठवड्यात हा चारा वाढून पुढे १२ दिवसांत त्याची संपूर्ण वाढ होईल. एका ट्रेमध्ये साधारण सहा किलोपेक्षा अधिक चारा उपलब्ध होईल.

वेळ, पाणी अन् जागेचीही बचत : या चाऱ्यामध्ये पौष्टिक प्रथिने, कर्बोदके, चवदार जीवनसत्त्व, सूक्ष्म अन्न घटकांचे प्रमाण भरपूर आहे. कमी पाणी लागत असल्यामुळे हे तंत्रज्ञान महत्त्वाचे ठरत आहे. यामुळे कमी जागेत कमी खर्चात सगळ्या प्रकारच्या हवामानात वर्षभर चारा उत्पादन करणे शक्य आहे.

भरडलेल्या धान्यापेक्षा पौष्टिक : दुभत्या जनावरांना चारा म्हणून भरडलेले धान्य मोठ्या प्रमाणात दिले जाते. मात्र, पशुपालकांनी शोधलेल्या हायड्रोफोनिक चारानिर्मिती (चरळूश डशशवी ऋी कूर्वीपिळली) तंत्राच्या माध्यमातून केली जाते. हा चारा भरडलेल्या धान्यापेक्षा सुद्धा पौष्टिक आहे.

शंभर टक्के सेंद्रिय, शेळ्यांनाही उपयोगी : चारा तयार करण्यासाठी कोणतेही रासायनिक खत किंवा औषध वापरले जात नसल्याने हा चारा १०० टक्के सेंद्रिय आहे हा चारा शेळ्या आवडीने खात असून, यामुळे शेळीचे आरोग्य चांगले राहते.

# पपई लागवड तंत्रज्ञान

पपई लागवड हे कमी वेळेत आणि कमी खर्चात चांगले उत्पन्न देणारे एक महत्त्वाचे फळपीक आहे. पपईच्या यशस्वी लागवडीसाठी खालील बाबींची काळजी घेणे आवश्यक आहे:

हवामान आणि जमीन :हवामान: पपईसाठी उष्ण व दमट हवामान उत्तम असते. अतिथंड किंवा अतिउष्ण हवामान पिकासाठी हानिकारक असते. जमीन: चांगल्या निचऱ्याची, हलकी ते मध्यम काळसर जमीन लागवडीसाठी योग्य असते. जमिनीत पाणी साचून राहिल्यास खोडकुज किंवा मूळकुज हा रोग होतो. जमिनीचा सामू (कि) ६.५ ते ७.५ दरम्यान असावा.

सुधारित जाती :व्यापारी जाती: तैवान ७८६ (रेड लेडी), कुर्ग हनिड्यू, पुसा डेलीशियस, पुसा मॅजेस्टी, पुसा ड्वार्फ आणि को-२ ते को-७. विशेष पसंती: 'तैवान ७८६ (रेड लेडी)' ही जात तिच्या उत्तम उत्पादनक्षमता, गोडवा आणि वाहतुकीसाठी योग्य असल्यामुळे सर्वाधिक लोकप्रिय आहे.

लागवडीची वेळ आणि अंतर :लागवडीचा काळ: जून-जुलै (पावसाळी), सप्टेंबर-ऑक्टोबर (हिवाळी) किंवा फेब्रुवारी-मार्च (उन्हाळी).

लागवडीचे अंतर :६ बाय ६ फूट (१.८ बाय १.८ मीटर) किंवा ७ बाय ५ फूट.

खत व्यवस्थापन :सेंद्रिय खत: खड्डा भरताना प्रति खड्डा १० ते १५ किलो चांगले कुजलेले शेणखत, १ किलो सिंगल सुपर फॉस्फेट आणि ५० ग्रॅम ट्रायकोडेर्मा मिसळावे.

रासायनिक खते (प्रति झाड दरवर्षी): नत्र २०० ग्रॅम, स्फुरद : २०० ग्रॅम, पालाश: २५० ग्रॅम. ही खते लागवडीनंतर २रा, ४था आणि ६व्या महिन्यात समान हप्त्यांमध्ये विभागून द्यावीत.पाणी व्यवस्थापन :ठिबक सिंचन : पपईसाठी ठिबक सिंचन उत्तम मानले जाते. यामुळे पाण्याचा योग्य वापर होतो आणि पाणी साचून राहण्याचा धोका टळतो. उन्हाळ्यात: दर २-३ दिवसांनी पाणी द्यावे. हिवाळ्यात: दर ८-१० दिवसांनी पाणी द्यावे.

रोग व कीड नियंत्रण :रिंग स्पॉट व्हायरस (विषाणूजन्य रोग): हा रोग मावा आणि पांढरी माशी यांच्याद्वारे पसरतो. उपाय: लागवडीच्या वेळी निंबोळी पेंड वापरावी. बाधित झाडे काढून नष्ट करावीत. कीड नियंत्रणासाठी इमिडाक्लोप्रिड किंवा ॲसिटामिप्रिडची फवारणी करावी. खोडकुज / मूळकुज: पाणी साचल्यामुळे हा बुरशीजन्य रोग होतो. उपाय: कॉपर ऑक्सिक्लोराईड किंवा मेटलॅक्सिलची झाडाच्या बुंध्याजवळ आळवणी करावी.

काढणी आणि उत्पादन : काढणी: लागवडीनंतर ८ ते १० महिन्यांत फळे काढणीस तयार होतात. फळांचा हिरवा रंग बदलून पिवळसर छटा दिसू लागल्यावर फळे काढावीत. उत्पादन: चांगल्या व्यवस्थापनाखाली एका झाडापासून ५० ते ८० किलो फळे मिळतात. एका एकरातून ४० ते ६० टन उत्पन्न मिळू शकते.



# कापूस वेचणीपूर्वी अशी घ्या काळजी

कापूस वेचणी हा कापूस पिकाच्या संपूर्ण हंगामातील सर्वात महत्त्वाचा टप्पा आहे. योग्य वेळी आणि योग्य पद्धतीने वेचणी केल्यास कापसाची गुणवत्ता उत्तम राहून बाजारात चांगला भाव मिळण्यास मदत होते. कापूस वेचणीपूर्वी आणि वेचणीदरम्यान खालील गोष्टींची काळजी घेणे गरजेचे आहे:

वेचणीची वेळ आणि नियोजन :वेचणी सकाळी किंवा ऊन पडल्यावर करावी: भल्या पहाटे वेचणी करणे टाळावे, कारण सकाळी शेतात किंवा कापसावर दव असते. दमट/ओलसर कापूस वेचल्यास त्यात बुरशी लागण्याची आणि रंग पिवळसर किंवा काळवंडण्याची शक्यता असते. सकाळी ९ ते १० नंतर किंवा दव वाळल्यानंतरच वेचणी सुरू करावी. योग्य वेळी वेचणी: सर्व बोंडे पूर्णपणे उमलल्यानंतर आणि बोंडातील कापूस चांगला सुकल्यावरच वेचणी करावी. अर्धी उमललेली किंवा कच्ची बोंडे वेचू नयेत.

कचरा व सुक्या पालापाचोळ्यापासून बचाव :स्वच्छ वेचणी: कापूस वेचताना बोंडाच्या भोवती असलेली वाळलेली पाने, पाकळ्या (कॅलिक्स) किंवा काडीकचरा कापसासोबत येणार नाही याची



दक्षता घ्यावी. वेगळे वर्गीकरण: कीड लागलेला (उदा. गुलाबी बोंडअळीमुळे बाधित), पिवळसर, डाग पडलेला किंवा खराब झालेला कापूस आणि चांगला पांढराशुभ्र कापूस एकाच पिशवीत न ठेवता त्यांची वेगवेगळी वेचणी करावी. खराब कापूस चांगल्या कापसात मिसळल्यास संपूर्ण कापसाचा दर्जा घसरतो.

वेचणी आणि साठवणूक :सुती कपड्यांचा वापर: कापूस वेचताना किंवा बांधताना वापरली जाणारी पिशवी/पोते हे नेहमी सुती कापडाचे असावे. प्लास्टिक आणि नायलॉनचा वापर पूर्णपणे टाळा: नायलॉन किंवा प्लास्टिकच्या पोत्यांमध्ये कापूस गोळा केल्यास किंवा बांधल्यास प्लास्टिकचे बारीक धागे कापसात मिसळतात. यामुळे सुतगिरणीत धागा तयार करताना मोठी अडचण येते आणि कापसाची प्रत खालावते. डोक्यावर सुती रुमाल किंवा टोपी: वेचणी करणाऱ्या कामगारांच्या डोक्यातील केस कापसात गळू नयेत म्हणून डोक्यावर सुती कपडा किंवा रुमाल बांधणे फायदेशीर ठरते.

वाळवणे आणि साठवणूक :कापूस उन्हात सुकवणे: वेचणीनंतर कापूस काही वेळ स्वच्छ ताडपत्रीवर किंवा सिमेंटच्या खळ्यावर उन्हात पसरवून चांगला सुकवून घ्यावा. मातीत किंवा धुळीत कापूस पसरवू नये. साठवणुकीची जागा: कापूस साठवण्याची जागा कोरडी, हवेशीर आणि दमटपणा नसलेली असावी. तसेच त्या ठिकाणी पाणी, उंदीर किंवा पाळीव प्राणी पोहचणार नाहीत याची काळजी घ्यावी. ह्या साध्या पण महत्त्वाच्या गोष्टींचे पालन केल्यास कापसाचा रंग, चमक आणि धाग्याची लांबी उत्तम राहते, ज्यामुळे बाजारात कापसाला ग्रॅडिंग आणि भाव दोन्ही चांगले मिळतात.

## दिन विशेष

जागतिक दिवस:
आंतरराष्ट्रीय ओझोन दिन
मेक्सिकोचा स्वातंत्र्यदिन

### महत्वाच्या घटना

१६२० : 'मेफ्लॉवर' जहाजाने साउदॅम्पटन बंदरातुन उत्तर अमेरिकेकडे प्रयाण केले.
१८२१ : मैक्सिकोच्या स्वातंत्रतेला मान्यता देण्यात आली होती.
१८६१ : ब्रिटन देशांतील पोस्ट ऑफिस मध्ये बचत खाता उघडण्यास सुरुवात झाली.
१९०८ : 'जनरल मोटर्स कॉर्पोरेशन' या कंपनीची स्थापना झाली.
१९३५ : इंडियन कंपनीज अ‍ॅक्ट अन्वये 'बँक ऑफ महाराष्ट्र'ची नोंदणी करण्यात आली.
१९४५ : दुसरे महायुद्ध हाँगकाँगमधील जपानी सैन्याने रॉयल नेव्हीसमोर शरणागती पत्करली
१९६३ : झेरॉक्स ९१४ या प्रतिमुद्रक यंत्राचे पहिले प्रात्यक्षिक.
१९६७ : सोव्हियत संघाने पूर्व कजाख मध्ये आण्विक चाचणी केली.
१९७५ : पापुआ न्यू गिनी या देशाला (ऑस्ट्रेलियापासुन) स्वातंत्र्य मिळाले.
१९८७ : ओझोनच्या थराच्या कमीत कमी संरक्षण करण्यासाठी मॉन्ट्रियल प्रोटोकॉलवर स्वाक्षरी केली आहे.
१९९७ : आय. टी. सी. आंतरराष्ट्रीय मैदानी स्पर्धेत राजीव बालकृष्णन याने शंभर मीटर धावण्याच्या शर्यतीत १०.५० सेकंद वेळ नोंदवून राष्ट्रीय विक्रम केला.
१९९७ : संस्कृत भाषेसंदर्भात प्रशंसनीय कार्य केल्याबद्दल मुंबई येथील मराठा मंदिर संस्थेच्या वरळी हायस्कूलमधील संस्कृतचे निवृत्त शिक्षक पं. गुलाम दस्तगीर अब्बासअली बिराजदार यांना 'राष्ट्रीय संस्कृत पंडित' हा राष्ट्रपतींकडून दिला जाणारा पुरस्कार जाहीर
२००८ : भारतीय हेवी इलेक्ट्रिकल्स लिमिटेड (भेल) च्या कर्मचाऱ्यांना विश्वकर्मा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१३८० : चार्ल्स (सहावा) फ्रान्सचा राजा (मृत्यू: २१ आक्टोबर १४२२)
१३८६ : हेन्री (पाचवा) इंग्लंडचा राजा (मृत्यू: ३१ ऑगस्ट १४२२)
१८५३ : नोबेल पारितोषिक विजेते जर्मन डॉक्टर आल्ब्रेख्त कॉसेल यांचा जन्म.
१८८८ : बेंटले मोटर्स लिमिटेड चे डब्ल्यू ओ. बेंटले यांचा जन्म. (मृत्यू: १३ ऑगस्ट १९७१)
१९०७ : वामनराव सडोलीकर भारतीय हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताच्या जयपूर-अत्रोली घराण्यातील प्रसिद्ध शास्त्रीय गायक (मृत्यू: २५ मार्च १९९१)
१९१३ : कमलाबाई कृष्णाजी ओगले 'रुचिरा' या पाकशास्त्रावरील प्रचंड खपाच्या पुस्तकाच्या लेखिका (मृत्यू: २० एप्रिल १९९९)
१९१६ : एम. एस. सुब्बुलक्ष्मी भारतरत्न, पद्मभूषण, पद्म विभूषण पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय शास्त्रीय कर्नाटकी गायक (मृत्यू: ११ डिसेंबर २००४)
१९२३ : सिंगापूरचे पहिले पंतप्रधान ली कुआन यी यांचा जन्म. (मृत्यू: २३ मार्च २०१५)
१९२५ : आयर्लंडचे पंतप्रधान चार्ल्स हॉगे यांचा जन्म.
१९३१ : भारतीय क्रिकेट पंच आर. रामचंद्र राव यांचा जन्मदिन.
१९४२ : नामदेव धोंडो तथा 'ना. धों' महानोर निसर्ग कवी व प्रयोगशील शेतकरी, त्यांना 'पानझड' या कवितासंग्रहासाठी साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला आहे. १९ व्या मराठवाडा साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. त्यांना पद्मश्री पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.
१९५४ : संजय बंदोपाध्याय भारतातील बंगाली हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतातील प्रख्यात सितार वादक
१९५६ : डेव्हिड कॉपरफिल्ड अमेरिकन जादूगार
१९७१ : भारतीय हिंदी चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध गीतकार, पटकथा लेखक व कवी प्रसून जोशी यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६८१ : मुघल शासक दारा शिकोह आणि सम्राट औरंगजेब यांची मोठी बहीण जहाँनारा बेग़म यांचे निधन.
१७३६ : डॅनियल फॅरनहाइट जर्मन शास्त्रज्ञ (जन्म: २४ मे १६८६)
१८२४ : लुई (अठरावा) फ्रान्सचा राजा (जन्म: १७ नोव्हेंबर १७५५)
१९३२ : सर रोनाल्ड रॉस हिवतापाच्या जंतुंचा शोध लावल्याबद्दल नोबेल पारितोषिक मिळवणारे (१९०२) ब्रिटिश डॉक्टर (जन्म: १३ मे १८५७ आल्मोडा, उत्तराखंड)
१९४४ : भारतीय अभियंता व काशी हिंदू महाविद्यालयाचे माजी उप कुलगुरू ज्वालाप्रसाद यांचे निधन.
१९६५ : फ्रेड क्रिम्बी अमेरिकन ॲनिमेशनपट निर्माते (जन्म: ३१ जुलै १८८६)
१९६५ : परमवीर चक्र पुरस्कार विजेता भारतीय सैन्य अधिकारी लेफ्टनंट कर्नल ए.बी. तारापोर यांचे निधन.
१९७३ : पुण्यातील जुन्या पिढीतील सरदार, पर्वती संस्थानचे विश्वस्त, संगीतज्ञ, इतिहासाचे अभ्यासक गंगाधरराव नारायणराव तथा आबासाहेब मुजुमदार यांचे निधन. त्यांचे मूळ नाव श्रीधर पांडुरंग प्रभुणे होते. मुजुमदारांकडे ते दत्तक गेले. पुण्याच्या भारत इतिहास संशोधक मंडळाचे ते चोवीस वर्षे चिटणीस होते.
१९७७ : केसरबाई केरकर साहित्य नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित जयपूर-अतरौली घराण्याच्या भारतीय शास्त्रीय गायिका (जन्म: १३ जुलै १८९२)
१९८४ : बिकीनि चे निर्माते लुई रायर्ड यांचे निधन. (जन्म: १६ सप्टेंबर १९८४)
१९९४ : जयवंत दळवी साहित्यिक, नाटककार व पत्रकार. कथा, कादंबरी, नाटक, प्रवासवर्णन, विनोदी लेख असे विविध प्रकार त्यांनी हाताळले. ते 'ठणठणपाळ' या टोपणनावाने विनोदी व मार्मिक लेखन करीत. (जन्म: १४ ऑगस्ट १९२५)
२००५ : लेसर चे शोधक गॉर्डन गूल्ड यांचे निधन. (जन्म: १७ जुलै १९२०)
२०१२ : आयमॅक्स चे सहसंस्थापक रोमन कोरियटर यांचे निधन. (जन्म: १२ डिसेंबर १९२६)
२०१७ : पद्मविभूषण पुरस्कार सन्मानित भारतीय वायुदलाचे वरिष्ठ अधिकारी मार्शल अर्जन सिंह यांचे निधन.



राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत



# पाथर्डी येथे चाकूचा धाक दाखवून दीपक येळाई यांना लुटणारे ४ आरोपी जेरबंद;गुन्हे शाखेची धडक कारवाई

पाथर्डी । प्रतिनिधी

दि.०१/१०/२०२६ रोजी दुपारी ०१.०० वा. सुमारास यातील फिर्यादी दिपक सुधाकर येळाई वय ६२ रा.मेन रोड क्रांती चौक पाथर्डी हे त्यांचा प्लॉट विक्रीचे पैसे घेऊन क्रांती चौक येथे जात असताना दोन विनाक्रमांकाच्या मोटार सायकलवरु चार अनोळखी आरोपी येऊन त्यांनी फिर्यादीचे हातावर लोखंडी सुरा मारला तसेच कुकरीचा धाक दाखवून त्यांचेकडील पैशाची बॅग जबरीने चोरुन नेली.

याबाबत पाथर्डी पोलीस स्टेशन गु.र.न११९६/२०२६ बीएनएस कलम ३०९ (६)३(५) प्रमाणे गुन्हा दाखल आहे पोलीस अधीक्षक ममुका सुदर्शन यांनी स्थानिक गुन्हे शाखेस मालाविरुध्दचे गुन्हे उघडकीस आणण्याचे आदेश दिले होते त्यानुषंगाने गुन्हे




शाखेचे पो.नि.संतोष मुटकुळे यांनी पोउपनि/ विकास जाधव पोलीस अंमलदार अरूण गांगुर्डे अतुल लोटके रणजीत जाधव बाळासाहेब खेडकर योगेश कर्डीले किशोर शिरसाठ व प्रशांत राठोड याचे पथक तयार करुन गुन्हा उघडकीस आणणेबाबत मार्गदर्शन करुन पथक रवाना केले दि.१२/१०/२०२६ रोजी तपास पथक गोपनीय माहिती व तांत्रीक विश्लेषणाच्या आधारे गुन्हयाचा समांतर तपास करत असताना खात्रीशीर माहिती मिळाली की हा गुन्हा मुदस्सर उर्फ मुज्जु सय्यद याने त्याचे साथीदारासह केला असून तो सध्या एम.एम.निऱ्हाळी हायस्कुलजवळ माणिकदौंडी रोड पाथर्डी येथे आहे मिळालेल्या माहितीवरून पथकाने नमूद ठिकाणी आरोपीचा शोध घेऊन १) मुदस्सर उर्फ मुज्जु सादीक सय्यद वय २२ रा.एडके कॉलनी ता.पाथर्डी यास ताब्यात घेतले ताब्यातील आरोपीस गुन्हयांचे अनुषंगाने विचारपूस करता त्याने सदरचा गुन्हा त्याचे साथीदार २) साहिल खान रा.तिसगाव ता.पाथर्डी (फरार) ३) राजू ठाकुर पुर्ण नाव माहित नाही रा.दिल्ली (फरार) ४) सुरज संतोष वडागळे, रा.बेल्हेकरवाडी रोड सोनई ता.नेवासा ५) आकाश शरद हराळे रा.सोनई ता.नेवासा ६)विशाल ब्राम्हणे पुर्ण नाव माहित नाही रा.शनिशिंगणापूर ता.नेवासा ७) सोमनाथ रमेश काळोखे रा.पाथर्डी (फरार) ८) इसाक पापा शेख रा.दुलेचांदगाव ता.पाथर्डी ९) राजू ठाकूर याचे दोन मित्र नाव पत्ता माहित नाही यांचेसह केल्याची माहिती दिली आरोपीने साथीदारांच्या सांगीतलेल्या माहितीवरून त्यांचा शोध घेऊन सुरज संतोष वडागळे आकाश शरद हराळे इसाक पापा शेख यांना ताब्यात घेतले ताब्यातील आरोपी मुदस्सर उर्फ मुज्जु सादीक सय्यद याचेकडे गुन्हयातील चोरी केलेल्या मुद्देमालाबाबत विचारपूस केली असता त्याने चोरी केलेल्या रक्कमेपैकी त्याचे वाट्यास आलेले २,००,०००/- रूपये असून आरोपी विशाल ब्राम्हणे यास ७०,०००/- व उर्वरीत सर्व रक्कम ही आरोपी साहिल खान राजू ठाकुर यांचेकडे असल्याचे सांगीतले आरोपी मुदस्सर उर्फ मुज्जु सादीक सय्यद याने त्याच्या वाट्यास आलेले रक्कमेतून ३०,०००/- रूपये खर्च केले असून उर्वरीत रक्कम घरी ठेवल्याची माहिती दिली यावरून पथकाने पंचासमक्ष तपासकामी १,७०,०००/- रूपये रोख रक्कम एक पिशवी व १०,०००/- रू.किं. त्यात एक मोबाईल असा एकुण १,८०,०००/- रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

## जिल्हाधिकाऱ्यांकडून मंठा चौफुली ते न्हावा रस्त्याची पाहणी

### तात्काळ रस्ता दुरुस्त करण्याचे बांधकाम विभागाला आदेश



जालना । प्रतिनिधी

जिल्हा प्रशासनाची माहिती प्रसारण करण्यासाठी जिल्हा माहिती कार्यालयाकडे कर्मचारी स्टॉप नसल्यामुळे याप्रकरणी अद्याप पर्यंत जिल्हा माहिती अधिकारी यांनी कोणतेच प्रयत्न केला नसल्याचे दिसून येत आहे . तसेच एक कर्मचारी चांगलं कामकाज करीत असताना सदरील कर्मचाऱ्याला त्रास दिल्यामुळे या कर्मचाऱ्यांनी बदली करून घेतली असल्याचे बोलल्या जात आहे. सदरील कर्मचारी गेल्यामुळे जिल्हा प्रशासनाची माहिती प्रसिद्ध करण्यासाठी अडचण निर्माण होत आहे. जिल्हा माहिती कार्यालयातील कामकाजाचा परिणाम महसूल कर्मचाऱ्यावर येत आहे. मंठा चौफुली ते न्हावा रस्त्यावरील खड्डे तातडीने बुजवून दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर सुरू करण्याचे निर्देश सार्वजनिक बांधकाम विभागाला जिल्हाधिकारी आशिमा मित्तल दिले आहे .

मंठा चौफुली ते न्हावा रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर पडलेले खड्डे आणि त्यामुळे वाहनधारकांना होणारा त्रास लक्षात घेऊन जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांनी आज प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन या रस्त्याची पाहणी केली. सदर रस्त्यावरून प्रवास करताना नागरिकांना व वाहनचालकांना खड्ड्यांमुळे तीव्र अडचणींना तोंड द्यावे लागत असल्याच्या तक्रारी प्रशासनाकडे आल्या होत्या. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांनी रस्त्याची प्रत्यक्ष स्थिती पाहिली असता, रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडल्याचे निदर्शनास आले. नागरिकांची सुरक्षितता आणि सुरळीत वाहतूक लक्षात घेऊन जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित विभागाला रस्त्यावरील खड्डे बुजवून दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर हाती घेण्याचे निर्देश दिले. दुरुस्तीचे काम दर्जेदार असावे आणि ते विहित वेळेत पूर्ण व्हावे, असेही त्यांनी स्पष्ट केले. या पाहणीदरम्यान सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्री कोल्हे साहेब, प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री दौंड साहेब, महानगरपालिकेचे अभियंता, पोलीस विभागाचे अधिकारी व इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## सावरगाव घाट दसरा मेळाव्याला जाण्यासाठी ऊसतोड मजूर सज्ज

### दुष्काळाने होरपळलेल्या शेतकरी ऊसतोड मजुरांना मुंडे भाऊ बहीण काय संदेश देणार याकडे महाराष्ट्राचे लक्ष ?

पाथर्डी। प्रतिनिधी

पाथर्डी तालुका आणि भगवानगड परिसरातील तसेच महाराष्ट्रातील तमाम ओबीसी अठरापगड जाती धर्मातील सर्व ऊसतोड मजूर कामगार मुकादम वाहतूकदार हे लाखोंच्या संख्येने संत भगवानबाबा यांची जन्मभूमी असलेल्या बीड जिल्ह्यातील सावरगाव घाट येथील भाजपच्या नेत्या व पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे संबोधित करत असलेल्या दसरा मेळाव्याला जाणार आहेत अशी माहिती मुंडे समर्थक संजय कीर्तने यांनी दिली आहे भगवानगड परिसर येथील सर्व ओबीसी बांधव ऊसतोड मजूर कामगारांची एकत्रित बैठक संपन्न झाली यावेळी मुकादम बाळासाहेब बटुळे व इतर ऊसतोड कामगार प्रतिनिधी उपस्थित





होते यावर्षी महाराष्ट्रात सर्वदूर व मराठवाड्यात दुष्काळाचे खूप मोठे संकट उभे असल्याने शेतकरी प्रचंड अडचणीत आहे पशुधन चारा पाणी या समस्या अत्यंत झपाट्याने भेडसावत आहेत यामुळे यावर्षी दसरा साधारणपणे साजरा करण्याचे प्रयोजन असले तरी महाराष्ट्रात लोकनेते गोपीनाथ मुंडे यांनी चालू केलेल्या दसऱ्याची परंपरा व दसऱ्याचे सिमोलंघन करण्यासाठी व मंत्री पंकजा मुंडे माजी खासदार डॉ.प्रीतम मुंडे माजी मंत्री धनंजय मुंडे यांचे विचार ऐकण्यासाठी यावर्षीचा दसरा मेळावा मोठ्या ताकतीने यशस्वी करण्यासाठी मुंडे समर्थकांनी रणनीती आखली असल्याचे सांगितले यामुळे महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून सबंध मुंडे समर्थक ओबीसी अठरापगड जातीतील सर्व समाज बांधव आणि राष्ट्रसंत भगवानबाबा यांच्या बीड जिल्ह्यातील सावरगाव घाट येथे होणारा यावर्षीचा दसरा मेळावा हा ऐतिहासिक होणार असून राज्याचे माजी मंत्री धनंजय मुंडे हे देखील या मेळाव्याला उपस्थित राहणार असल्याने महाराष्ट्रातील लाखो मुंडे समर्थक आणि ओबीसी समाज बांधव मोठ्या संख्येने या दसऱ्याला उपस्थित राहणार असल्याचे सांगितले जात आहे लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या पश्चात अनेक वर्षानंतर मुंडे भाऊ-बहीण एकत्र दसऱ्याला संबोधित करणार असल्याने या मेळाव्याचे महाराष्ट्रातील राजकीय वर्तुळाकडे लक्ष लागून आहे.

विशेषतः ऊसतोड मजूर या दसरा मेळाव्याचे आकर्षण असल्याचे संजय कीर्तने यांनी सांगितले.

## रेशीम उत्पादक शेतकऱ्यांसाठी ग्लोबल विकास ट्रस्ट आणि बीड जिल्हा प्रशासनाचा सामंजस्य करार!

### दुष्काळ निवारणासाठी मास्टरप्लॅनवर चर्चा; बीडमध्ये महत्त्वपूर्ण बैठक

परळी । प्रतिनिधी

दुष्काळग्रस्त बीड जिल्ह्याच्या विकासाला गती देण्यासाठी आणि शेतकऱ्यांना आर्थिक आधार देण्याच्या दृष्टीने ग्लोबल विकास ट्रस्ट आणि जिल्हा प्रशासनाने महत्त्वपूर्ण पुढाकार घेतला आहे. बीड जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत रेशीम उत्पादक शेतकऱ्यांना प्रोत्साहन व सहकार्य देण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला असून, त्यावर स्वाक्षऱ्याही करण्यात आल्या. जिल्ह्याच्या विकासाचा मास्टरप्लॅन आणि दुष्काळ निवारणाच्या उपाययोजनांवर यावेळी सविस्तर चर्चा झाली.

जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीला ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष जलनायक मयंक गांधी, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे, जिल्हा रेशीम अधिकारी एस. बी. वराट यांच्यासह विविध अधिकारी उपस्थित होते. दुष्काळाचा सामना करण्यासाठी दहा कलमी कार्यक्रम, जलसंधारण, टंचाईग्रस्त गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा, पशुखाद्य डेपो अथवा चारा छावण्या आणि 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' योजनेच्या अंमलबजावणीवर विचारविनिमय करण्यात आला. नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना टप्पा २.० (पोखरा) मध्ये समाविष्ट गावांतील रेशीम उत्पादक शेतकऱ्यांना शासकीय अनुदान येईपर्यंत ३ लाख २० हजारांचे आर्थिक सहकार्य बँकेच्या माध्यमातून देण्यात येत आहे. यावेळी डॉ. एम. बी. पाटील लिखित 'दुष्काळात फळबागा जगवण्याचे उपाय' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. तसेच ठिबक सिंचनाच्या शासकीय योजनांचा लाभ घेताना शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी दूर करणे आणि ग्रामपंचायतींकडून प्राप्त झालेल्या पत्रांचा आढावा घेऊन विकासकामांचे नियोजन करणे यावर चर्चा झाली. रेशीम शेतीला प्रोत्साहन, जलसंधारणातून पाणीटंचाईवर मात आणि दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा, या उद्देशाने झालेला सामंजस्य करार आणि बैठकीतील चर्चा बीड जिल्ह्याच्या ग्रामीण विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

## मंठ्याचे गटशिक्षणाधिकारी वसुलीत मग्न शाळा तपासणीच्या नावाखाली वसुली?

मंठा। प्रतिनिधी

मंठा तालुक्यातील शिक्षण विभागाच्या कारभारावरून सध्या विविध प्रश्न उपस्थित होत असून, गटशिक्षणाधिकारी दत्तात्रय क्षीरसागर यांच्या कार्यपद्धतीबाबत शिक्षक, पालक व नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. शाळा तपासणीच्या नावाखाली वसुली केली जात असल्याचे आरोप होत असून, या प्रकरणाची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सखोल चौकशी करावी, अशी मागणी जोर धरत आहे. आस्थापना विभागातील सदाशिव तोटे व मनाळकर हे वसुलीच्या कामात अडथळा ठरत असल्याने त्यांना आस्थापना विभागातून हटविण्यात आल्याचे सांगितले जाते. त्याचवेळी केहाळवडगाव शाळेवर कार्यरत असलेल्या आंबटकर यांना थेट आस्थापना विभागात नियुक्ती देण्यात आल्याने या नियुक्तीमागील नेमके कारण काय ? असा सवाल पालक व शिक्षकांकडून उपस्थित केला जात आहे.



एकीकडे तालुक्यातील शाळांमध्ये शिक्षक व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रश्नांकडे लक्ष देण्याची गरज असताना, दुसरीकडे आस्थापना विभागातील बदलांमुळे शिक्षण विभागाचा कारभार चर्चेत आला आहे. आंबटकर यांना त्यांच्या मूळ शाळेवर परत पाठवून आस्थापना विभागातील नियुक्ती रद्द करावी, अशी मागणी पालक वर्गातून होत आहे. गटशिक्षणाधिकारी दत्तात्रय क्षीरसागर यांचे दुसरे वसुली प्रमुख म्हणून सेवानिवृत्त शिक्षक शिवाजी विधाते यांचे नाव चर्चेत असल्याचेही बोलले जात आहे. सेवानिवृत्तीनंतरही ते गटशिक्षणाधिकाऱ्यांसाठी वसुलीचे काम करत असल्याची चर्चा शिक्षकांमध्ये आहे. याची अधिकृत चौकशी होणे आवश्यक आहे. दरम्यान, तालुक्यातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, शिक्षकांवर अनावश्यक दबाव येऊ नये आणि शिक्षण विभागाचा कारभार नियमांनुसार पारदर्शकपणे चालावा, यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या संपूर्ण प्रकरणाची तातडीने चौकशी करावी अशी मागणी होत आहे.

**जाहिर प्रगटन**

**मा.श्री. रिजवान उ.शेख ३रे दिवाणी न्यायाधीश व. स्तर, बीड, यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क. १७१८/२०२६**

**ॲड. उबाळे एम. आर**

**सुशीला व ईतर वि. निरंक**

ज्यापेक्षा रामभाऊ पि. बापुराव भालशंकर, हे दिनांक ०१/०९/२०२६ रोजी, बहिरवाडी, ता.जि. बीड, येथे मयत झालेले आहेत, तसेच अर्जदार १. सुशीला भ्र. रामभाऊ भालशंकर, वय. ६१ वर्षे, धंदा. घरकाम, रा.नवनाथ नगर, एम.आय.डी.सी.बीड, ता.जि.बीड २. कृष्णा पि. रामभाऊ भालशंकर, वय. ४१ वर्षे, धंदा. व्यापार, रा. वरीलप्रमाणे ३. जयवंत पि. रामभाऊ भालशंकर, वय. ३९ वर्षे, धंदा. व्यापार, रा. वरीलप्रमाणे अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी असुन, अर्जदार क्र. २ व ३ हे मयताचे मुले आहेत. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कांत मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. वारस

त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे काणोस समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हा कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोट, सदरहु अर्जदारांच्या हक्कांतबददल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा/अर्जदारांच्या हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/अर्जदारांना सदरहु मयत नामे रामभाऊ पि. बापुराव भालशंकर, हे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख: २३ / ११ / २०२६ ही आहे. आज दिनांक १४ आक्टोबर २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्या निशी दिले.

स्वाक्षरित
**कनिष्ठ लिपिक**
दिवाणी न्यायालय, व स्तर, बीड

आदेशावरुन
स्वाक्षरीत/-
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व स्तर, बीड

**हरवले आहे**

गणेश विद्यालय आष्टी रोहित वांढरे जामखेड आष्टी बस प्रवासात: १० वी सनद, मार्कशीट, टीसी,ITI १२ मार्कशीट टीसी मार्कशीट सनद , MSCIT, टायपिंग इंग्लिश व मराठी सर्टिफिकेट BA डीग्री चे मार्कशीट रोहित वांढरे महावितरण: रोहित राजेंद्र वांढरे पांढरी ज्याला कुणाला सापडले असेल त्यांनी या नंबर वर संपर्क करावा.७०८३५ ७०३२३

Daily Rajya Loktantra Date 15/10/2026

**नाव दुरुस्ती**

मी, लक्ष्मि विनायक बडे (Laxmi Vinayak Bade),, राहणार वारणी, ता. शिरूर (कासार), जि. बीड, महाराष्ट्र, असे जाहीर करते की, माझे जुने नाव लक्ष्मीबाई (Lakhmibai) असे काही कागदपत्रांमध्ये नमूद आहे. माझे योग्य व पूर्ण नाव लक्ष्मि विनायक बडे (Laxmi Vinayak Bade) असे आहे.

यापुढे सर्व शासकीय, निमशासकीय तसेच इतर सर्व कागदपत्रांमध्ये माझे नाव लक्ष्मि विनायक बडे (Laxmi Vinayak Bade) असेच ग्राह्य धरावे.

Daily Rajya Loktantra Date 15/10/2026

**नाव दुरुस्ती**

मी, बडे विनायक रामराव (Bade Vinayak Ramrao), राहणार वारणी, ता. शिरूर (कासार), जि. बीड, महाराष्ट्र, असे जाहीर करतो की, माझे जुने नाव विनायक (Vinayak) असे काही कागदपत्रांमध्ये नमूद आहे. माझे योग्य व पूर्ण नाव बडे विनायक रामराव (Bade Vinayak Ramrao) असे आहे.

यापुढे सर्व शासकीय, निमशासकीय तसेच इतर सर्व कागदपत्रांमध्ये माझे नाव बडे विनायक रामराव (Bade Vinayak Ramrao) असेच ग्राह्य धरावे.

## केजमध्ये शिक्षण विस्तार अधिकारी, सहशिक्षक २० हजारांची लाच घेताना जाळ्यात!

### अनुकूल चौकशी अहवालासाठी ४० हजारांची मागणी; जालना एसीबीची कारवाई

**केज । प्रतिनिधी**

**चौकशीचा अहवाल बाजूने देण्यासाठी ४० हजार रुपयांच्या लाचेची मागणी करून पहिला हप्ता म्हणून २० हजार रुपयांची लाच स्वीकारणाऱ्या केज येथील शिक्षण विस्तार अधिकारी दत्तात्रय मुरलीधर चाटे (वय ५७) आणि त्यांना मदत करणारे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, तांदळवेस्ती येथील सहायक शिक्षक जयगुरू शिवाजी गिरी (वय ५०) या दोघांना जालना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) पथकाने बुधवारी रंगेहात पकडले. या कारवाईने शिक्षण क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार हे केज तालुक्यातील एका उच्च प्राथमिक शाळेत मुख्याध्यापक म्हणून कार्यरत आहेत. ऑगस्ट २०२६ मध्ये गट शिक्षण अधिकारी (केज) यांनी शालेय २.० शालार्थ वेतन प्रणालीच्या ऑनलाइन देयकांमध्ये अनियमितता केल्याप्रकरणी मुख्याध्यापकांना नोटीस बजावली होती. या प्रकरणाच्या चौकशीसाठी चौकशी अधिकारी म्हणून शिक्षण विस्तार अधिकारी दत्तात्रय चाटे यांची नियुक्ती करण्यात आली होती. तक्रारदार मुख्याध्यापक ९ ऑक्टोबर २०२६ रोजी चौकशी अधिकारी दत्तात्रय चाटे यांना त्यांच्या कार्यालयात भेटले असता, चौकशीचा अहवाल त्यांच्या बाजूने अनुकूल देण्यासाठी चाटे यांनी ४० हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली. यानंतर मुख्याध्यापकांनी १४ ऑक्टोबर २०२६ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना यांच्याकडे लेखी तक्रार नोंदवली. तक्रारीच्या अनुषंगाने एसीबीच्या पथकाने १४ ऑक्टोबर रोजी पंचांसमक्ष गट शिक्षण अधिकारी कार्यालय, केज येथे लाचेच्या मागणीची पडताळणी केली. त्या दरम्यान दत्तात्रय चाटे यांनी तक्रारदाराकडून ४० हजार रुपये स्वीकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर दुपारी १५:४० वाजता गट शिक्षण अधिकारी कार्यालयात सापळा रचण्यात आला. यावेळी दत्तात्रय चाटे यांच्या सांगण्यावरून सहायक शिक्षक जयगुरू गिरी यांनी तक्रारदाराकडून पहिला हप्ता म्हणून २० हजार रुपयांची लाच पंचांसमक्ष स्वीकारली. पैसे स्वीकारताच दबा धरून बसलेल्या पथकाने दोघांनाही लाचेच्या रकमेसह रंगेहात ताब्यात घेतले. या प्रकरणी आरोपी दत्तात्रय चाटे आणि जयगुरू गिरी यांच्याविरुद्ध पोलीस ठाणे केज येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ व १२ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. सदर यशस्वी कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगरच्या पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी केदार कांगणे व अपर पोलीस अधीक्षक शशिकांत सिंगारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक बी. एस. जाधव, पोलीस अंमलदार गजानन घायवट, मनोहर भुतेकर, गणेश चेके आणि विठ्ठल कापसे यांच्या पथकाने केली.

दैनिक राज्य लोकतंत्र

गुरूवार दि.१५ ऑक्टोबर २०२६ | ६

# भगवान भक्तीगडावर दसरा मेळाव्याचे आयोजन

## • उपस्थितीत राहण्याचे ना.पंकजाताई मुंडे यांचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

**राष्ट्रसंत भगवान बाबांच्या जन्मभूमीत सावरगाव घाट येथील भगवान भक्तीगडावर होणाऱ्या दसरा मेळाव्याची दरवर्षीच उत्सुकता असते. लाखोंची गर्दी हे या मेळाव्याचे वैशिष्ट्य असते. या अनुषंगानेच आपली परंपरा, आपला दसरा साजरा करण्यासाठी मी येत आहे,आपणही या पण सुखरूप या व घरी सुखरूप परत जा असे आवाहन राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी केले आहे.**

भगवान भक्तीगडावर होणारा दसरा मेळावा वंचितांचा शोषितांचा मेळावा म्हणून या दसरा मेळाव्याची ओळख आहे.राष्ट्रसंत भगवान बाबांची जन्मभूमी असलेल्या पाटोदा तालुक्यातील सावरगाव घाट येथील भगवान भक्ती गडावर हा मेळावा दरवर्षी होत असतो.यंदाचा दसरा मेळावा २० ऑक्टोबर रोजी असणार आहे.या दसरा मेळाव्यात ना. पंकजाताई मुंडे यांचे मार्गदर्शन ऐकण्यासाठी राज्यभरातून भगवान बाबांचे भक्त आणि मुंडे समर्थक लाखोंच्या संख्येने भगवान भक्ती गडावर दाखल होत असतात.संत भगवान बाबाची जन्मभूमी असल्याने सावरगाव घाट येथे होणाऱ्या या मेळाव्याला विशेष महत्त्व आहे. सावरगाव घाट येथे पाण्यावर ज्ञानेश्वरी वाचत असलेली राष्ट्रसंत भगवान बाबाची भव्य मूर्ती आणि तळघरात भगवान बाबांची मूर्ती अशा स्वरूपाची भव्य वास्तू येथे असुन या मेळाव्यासाठी लाखोंच्या संख्येने जनसमुदाय दरवर्षी उपस्थित असतो.



### प्रशासनाची परवानगी

संत भगवानबाबा स्मारक मंदिर परिसरातील भगवान भक्तीगडावर यंदा पारंपरिक दसरा मेळावा २० ऑक्टोबर रोजी घेण्यास प्रशासनाने परवानगी दिली आहे. पाटोद्याचे तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी यांनी यासंदर्भातील मंजुरी पत्र दिले आहे. आयोजकांनी ६ ऑक्टोबर रोजी दिलेल्या अर्जाच्या अनुषंगाने ही परवानगी देण्यात आली आहे. भगवान भक्तीगडावर दसरा मेळाव्यासाठी सुमारे ५.२७ हेक्टर क्षेत्रातील १० एकर १० गुंठे जागा उपलब्ध असुन याठिकाणी दसरा मेळावा होणार आहे.

या पार्श्वभूमीवर भगवान भक्तीगडावर मेळाव्याची तयारी सुरु आहे. या अनुषंगानेच पंकजाताई मुंडे यांनी एका व्हिडिओ द्वारे समर्थकांना आवाहन केले आहे. आपला दसरा आणि आपल्या परंपरेसाठी मी भगवान भक्तीगडावर येत आहे तुम्ही पण या, सुखरूप या आणि सुखरूप परत घरी पुरणपोळी खाण्यासाठी पोहचा असा भावनिक संदेश ना.पंकजाताई मुंडे यांनी दिला आहे.

# दिंद्रुडच्या वैद्यकीय अधिकाऱ्याचा पदभार काढला

## जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांची धडक कारवाई

बीड । प्रतिनिधी

**माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड प्राथमिक आरोग्य केंद्र येथे एका आजारी आणि बेशुद्ध विद्यार्थिनीला रुग्णवाहिकेसाठी डिझेलच्या पैशांची मागणी करून चक्क खाली उतरवल्याच्या घटनेची जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांनी अत्यंत गंभीर दखल घेत धडक कारवाई केली आहे. याप्रकरणी कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेवत वैद्यकीय अधिकारी डॉ. निलेश नारायण ढाकणे यांच्याकडील पदभार प्रशासनाने तात्काळ काढून घेतला असून, त्यांच्यावर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे.**

दिंद्रुड येथील जिल्हा परिषद शाळेत इयत्ता पाचवीमध्ये शिकणाऱ्या एका विद्यार्थिनीला शाळेत अचानक फिट आल्याने शाळेचे मुख्याध्यापक श्री. मनोहर कटारे व त्यांच्या सहकाऱ्यांनी तिला तातडीने दिंद्रुड प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले होते. मुलीची प्रकृती चिंताजनक असल्याने तेथील वैद्यकीय अधिकारी डॉ. निलेश नारायण ढाकणे यांनी तिला पुढील उपचारासाठी रेफर करण्याचा सल्ला दिला. मात्र, यावेळी मुलीच्या नातेवाईकांकडे रुग्णवाहिकेसाठी डिझेलच्या पैशांची मागणी करण्यात आली आणि पैसे नसल्याने त्या आजारी मुलीला रुग्णवाहिकेतून खाली उतरवण्यात आले, अशा स्वरूपाच्या बातम्या वृत्तपत्रे आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये प्रसिद्ध झाल्या होत्या. माध्यमांमधील या वृत्ताची जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने अत्यंत जलद गतीने आणि तातडीने दखल घेतली. या संपूर्ण प्रकरणात प्राथमिक आरोग्य केंद्र दिंद्रुड येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. निलेश नारायण ढाकणे (गट-अ) यांच्याकडून कर्तव्यात कसूर झाल्याचे प्रथमदर्शनी प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. जनसामान्यांच्या आरोग्याशी निगडीत या संवेदनशील प्रकरणात कोणतीही तडजोड न करता, प्रशासनाने डॉ. निलेश नारायण ढाकणे यांच्याकडील दिंद्रुड प्राथमिक ▶▶ पान २ वर

# ऊसतोड मजुरांच्या बालकांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात!

बीड । प्रतिनिधी

अवनि संस्था गेल्या ३४ वर्षांपासून कोल्हापूर, सांगली, सातारा तसेच मराठवाड्यातील बीड, धाराशिव, लातूर आणि छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांमध्ये हंगामी स्थलांतरित ऊसतोड मजुरांच्या बालकांच्या शिक्षणासाठी आणि सर्वांगीण विकासासाठी कार्यरत आहे.



गेल्या तीन वर्षांपासून अवनि संस्था, जागर प्रतिष्ठान, बीड आणि छत्रपती शाहू प्रतिष्ठान, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने बीड जिल्ह्यातून कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांमध्ये स्थलांतरित होणाऱ्या बालकांच्या शैक्षणिक प्रश्नांवर काम केले जात आहे. या अनुषंगाने संबंधित प्रशासनासोबत समन्वय साधून स्थलांतरित बालकांना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. मानवी हक्क आयोगाने दाखल केलेल्या सुमोटो प्रकरणामुळे मागील दोन वर्षांपासून बीड जिल्हा प्रशासनामार्फत प्रत्येक तालुक्यात दोन याप्रमाणे संत भगवान बाबा वसतिगृहे सुरू करण्यात आली आहेत. या वसतिगृहांच्या माध्यमातून अनेक स्थलांतरित ऊसतोड कामगारांच्या बालकांना शिक्षणासाठी मूळ गावीच सुविधा उपलब्ध झाल्यामुळे त्यांचे हंगामी स्थलांतर रोखण्यात यश आले आहे. अवनि संस्थेने केलेल्या सर्वेक्षणातून ही बाब निदर्शनास आली आहे. त्यामुळे चालू शैक्षणिक वर्षातही संत भगवान बाबा वसतिगृहांची प्रभावी ▶▶ पान २ वर

# महावितरणच्या निष्काळजीपणामुळे महासांगवीतील शेतकऱ्याचे मोठे नुकसान

## वीज पोल उभा करून भरपाई देण्याची तहसीलदारांकडे मागणी

पाटोदा । प्रतिनिधी

**वादळी वाऱ्यामुळे शेतातील विजेचे खांब (पोल) पडल्यानंतर वारंवार अर्ज करूनही महावितरण कंपनीकडून वीज पोल उभारून वीज पुरवठा सुरळीत करण्यात आलेला नाही. यामुळे पिकांना पाणी न मिळाल्याने लाखो रुपयांचे शेतीपिकांचे नुकसान झाले असून, जनावरांच्या पाण्याचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. याप्रकरणी तातडीने वीज पोल उभा करून विजेचे कनेक्शन जोडावे व नुकसानीची भरपाई द्यावी, अशी मागणी पाटोदा तहसीलदारांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, मौजे पाटोदा (जि. बीड) येथील जमीन सर्व्हे नं. ६६९/ई मधील शेतात दिनांक १३ मे २०२६ रोजी आलेल्या वादळी वाऱ्यामुळे विजेचे खांब पडले होते. यानंतर अर्जदार सिंधुबाई छगन गर्जे (रा. महासांगवी, ता. पाटोदा) यांनी १४ मे २०२६ रोजी महावितरण कंपनीकडे पोल उभा करून लाईन ओढण्यासाठी अर्ज दिला होता. तसेच १७ जुलै २०२६ रोजी दुसरा अर्जही करण्यात आला होता. परंतु, महावितरणने अद्यापही खांब उभारून वीज लाईन जोडलेली नाही. विशेष म्हणजे, पोल पडलेले असतानाही महावितरणकडून तब्बल २१,०५० रुपयांचे लाईट बिल देण्यात आल्याचे अर्जदाराने नमूद केले आहे. वीज पुरवठा खंडित झाल्यामुळे विहिरीतील पाणी शेताला देता आले नाही. परिणामी, सिंधुबाई गर्जे व त्यांच्या मुलांच्या (राजू व मोहन) नावावर असलेल्या सुमारे ४ हेक्टर ६२ आर क्षेत्रातील सोयाबीनचे ▶▶ पान २ वर

# माहिती न देणाऱ्या महासांगवीच्या ग्रामपंचायत अधिकाऱ्याला झटका

पाटोदा । प्रतिनिधी

माहितीच्या अधिकाराखाली मागितलेली माहिती वेळेत उपलब्ध न करून देणे महासांगवी (ता. पाटोदा) येथील जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकाऱ्याला चांगलेच महागात पडले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती पाटोदा यांनी अपिलार्थी यांच्या बाजूने निर्णय देत, आवश्यक शुल्क भरल्यानंतर पुढील ७ दिवसांत नियमानुसार माहिती उपलब्ध करून देण्याचे कडक आदेश दिले आहेत.

महासांगवी येथील रहिवासी श्री. गहिनीनाथ कांतीलाल गर्जे यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये १५ सप्टेंबर २०२६ रोजी पंचायत समिती पाटोदा येथे प्रथम अपिल (क्र. २३/२०२६) दाखल केले होते. या अपिलावर १२ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रथम सुनावणी ठेवण्यात आली होती. या सुनावणीदरम्यान अपिलार्थी श्री. गहिनीनाथ गर्जे स्वतः उपस्थित ▶▶ पान २ वर

# बीडमध्ये शिवाजीनगर पोलिसांची चक्री जुगार अड्ड्यावर कारवाई; अडीच लाखांचा मुद्देमाल जप्त

बीड । प्रतिनिधी

**शहरातील शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत संगणकीय व इलेक्ट्रॉनिक साधनांच्या मदतीने सुरू असलेल्या अवैध चक्री जुगार अड्ड्यावर पोलिसांनी छापा टाकून धडक कारवाई केली. या कारवाईत पोलिसांनी जुगाराचे साहित्य आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणांसह एकूण २ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**



दिनांक १३ ऑक्टोबर रोजी रात्री सुमारे ११ वाजेच्या सुमारास शिवाजीनगर पोलिसांच्या पथकाला गुप्त बातमीदारामार्फत चक्री जुगार सुरू असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी पंचांसह संबंधित ठिकाणी छापा टाकला असता, तिथे संगणकीय व इलेक्ट्रॉनिक साधनांच्या सहाय्याने चक्री नावाचा जुगार खेळवला जात असल्याचे निदर्शनास आले. या प्रकरणात घरमालक अमन मेहबूब शेख याने स्वतःच्या घरात जुगार खेळण्यासाठी जागा उपलब्ध करून दिली होती. तर शेख करीम शेख सलीम याने या जुगारासाठी स्वतःची आयडी वापरण्यास ▶▶ पान २ वर

# कृष्णा गायकवाड तीन जिल्ह्यांतून दोन वर्षांसाठी हद्दपार

आष्टी । प्रतिनिधी

परिसरात दहशत पसरवणे, मारामारी आणि बेकायदेशीर जमाव जमवण्यासारखे गंभीर गुन्हे दाखल असलेल्या दादेगाव (ता. आष्टी) येथील कृष्णा शिवाजी गायकवाड याला बीड, अहिल्यानगर व धाराशिव या तीन जिल्ह्यांतून दोन वर्षांसाठी हद्दपार करण्यात आले आहे. उपविभागीय दंडाधिकारी (पाटोदा) यांनी याबाबतचे कायदेशीर आदेश जारी केले आहेत.

अंभोरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दादेगाव येथील रहिवासी असलेला कृष्णा गायकवाड याच्यावर मारामारी करणे, धमकावणे, बेकायदेशीर जमाव जमवणे आणि नागरिकांमध्ये दहशत निर्माण करणे यांसारखे अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत. त्याच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे आष्टी तालुका व अंभोरा परिसरातील शांतता धोक्यात येऊन नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते. पोलिसांनी यापूर्वी त्याच्यावर प्रतिबंधात्मक कारवाया केल्या होत्या, मात्र तरीही ▶▶ पान २ वर

# मुख्यमंत्री साहेब पाच हजारात दिवाळी करून दाखवा-राजेंद्र आमटे

बीड । प्रतिनिधी

**कधी कोरडा तर कधी ओला दुष्काळ शेतकऱ्यांची पाठ सोडत नाही अशा परिस्थितीत शासनही शेतकऱ्यांची थट्टा करत असून केवळ पाच हजारात दिवाळी कशी साजरी करावी असा प्रश्न शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने उपस्थित करण्यात आला असून मुख्यमंत्र्यांनीच ५००० दिवाळी साजरी करून दाखवावी असे आव्हान राजेंद्र आमटे यांनी केले.**



दुष्काळ शेतकऱ्यांच्या पिकाची राख रांगोळी झाली आहे. कापूस गेला सोयाबीन गेले शेतकऱ्यांनी दिवाळी कशी करावी? शेतकरी हक्क मोर्चा च्या वतीने शेतकऱ्यांची दिवाळी गोड करावी अशी मागणी केली तर सरकारने शेतकऱ्यांना दुष्काळात धीर देण्याऐवजी शेतकऱ्याची थट्टा करण्याचे काम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांना आव्हान करतोय मुख्यमंत्री साहेब पाच हजार मध्ये तुमची दिवाळी साजरी करा आम्ही शेतकरी तुम्हाला ५ हजार रुपये देतो तुम्ही दिवाळी साजरी करून दाखवा? असे आव्हान शेतकरी हक्क मोर्चाचे राजेंद्र आमटे यांनी केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेली घोषणा म्हणजे दुष्काळी शेतकऱ्याच्या जखमेवर मीठ चालण्याचे काम मुख्यमंत्री यांनी केले आहे दिवाळी पूर्वी ५ हजार रुपये देणे म्हणजे राजा उधार झाला ▶▶ पान २ वर

# आष्टी, पाटोदा, शिरूर कासारच्या पाणीप्रश्नासाठी भीमराव धोंडे यांची जलसंपदामंत्री आणि महसूलमंत्री यांच्याशी मुंबईत भेट





आष्टी । प्रतिनिधी

दुष्काळग्रस्त आष्टी, पाटोदा आणि शिरूर कासार तालुक्यांतील पाणीटंचाई दूर करण्यासाठी जायकवाडी धरणातून थेट पाइपलाइनद्वारे १५ ते २० टीएमसी पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी माजी आमदार भीमराव धोंडे यांनी जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली. बुधवारी, १४ ऑक्टोबर रोजी मुंबईत झालेल्या भेटीदरम्यान त्यांनी पाणीपुरवठा, सिंचन, पशुधनासाठी चारा अनुदान आणि मजुरांना रोजगार उपलब्ध करून देण्यासंदर्भातील प्रश्न मांडले.

### जायकवाडीतून १५ ते २० टीएमसी पाण्याची मागणी

आष्टी, पाटोदा आणि शिरूर कासार तालुक्यांतील पाणीटंचाई दूर करण्यासाठी जायकवाडी धरणातून थेट पाइपलाइनद्वारे १५ ते २० टीएमसी पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी भीमराव धोंडे यांनी केली. तसेच शिंपोरा ते खुंटेफळ सिंचन योजनेतून साठवण तलावात येणाऱ्या पाण्याचे इतर तलावांमध्ये वितरण करण्यासाठी योग्य नियोजन करावे, असेही त्यांनी जलसंपदामंत्र्यांना सांगितले.

धोंडे यांनी जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे जायकवाडी धरणातून थेट पाइपलाइनद्वारे पाणी आणण्याची मागणी केली. तसेच आष्टी लिफ्ट सिंचन योजना क्रमांक तीनअंतर्गत शिंपोरा ते खुंटेफळ साठवण तलावात येणाऱ्या पाण्याचे इतर तलावांमध्ये वितरण करण्यासाठी नियोजन करावे, असेही त्यांनी सुचविले. या विषयावर चर्चा करण्यासाठी लवकरच ▶▶ पान २ वर



# देवदूत प्रतिष्ठानच्या गौरी-गणपती सजावट स्पर्धेचा निकाल जाहीर

दिंद्रुड । प्रतिनिधी

महिला वर्गातील सुप्त कलागुणांना वाव मिळावा आणि लोप पावत चाललेल्या पारंपरिक सण-उत्सवाची संस्कृती नव्या पिढीत रुजावी, या उदात्त हेतूने देवदूत प्रतिष्ठानच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य गौरी-गणपती सजावट स्पर्धेचा अंतिम निकाल आज जाहीर करण्यात आला आहे. पहिले वर्ष असुनसुद्धा यंदाच्या स्पर्धेला धारूर शहर व ग्रामीण भागातील महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला होता.

माजलगाव तालुक्यासाठी घेण्यात आलेल्या या स्पर्धेत प्रथम क्रमांक सौ .मीरा गोपाळ खांडेकर, द्वितीय क्रमांक सौ.प्रीती भागवत कोकणे तर तृतीय क्रमांक सौ.माधवी विठ्ठलराव सोळंके यांनी पटकाविला आहे. तसेच परीक्षकांच्या मनाचा ठाव घेणाऱ्या पाच स्पर्धकांना उत्तेजनार्थ बक्षीस जाहीर झाले असून त्यात सौ.सरिता कडाप्पा गिराम, सौ.कविता विनायक रत्नपारखी, सौ. स्नेहल पुष्कराज चौकीदार, सौ.पुष्पा विष्णुदास करवा, सौ. मनीषा संदीप भुतडा, यांचा समावेश आहे. धारूर तालुक्यासाठी घेण्यात आलेल्या या स्पर्धेत प्रथम क्रमांक सौ. अनुराधा अनिल डुबे, द्वितीय क्रमांक सौ. शुभांगी महादेव सवाशे तर तृतीय क्रमांक सौ. श्वेता नारायण वडगावकर यांनी पटकाविला आहे. तसेच पाच स्पर्धकांना उत्तेजनार्थ बक्षीस जाहीर झाले असून त्यात सौ. किरण कोकणे, सौ. अवंतिका अक्षय चिद्रवार, सौ. रेणुका ज्ञानेश्वर शिंदे, सौ. वर्षा लक्ष्मण शेवते आणि सौ. ऋतुजा रितेश चिद्रवार यांचा समावेश आहे. वडवणी तालुक्यासाठी घेण्यात आलेल्या या स्पर्धेत प्रथम क्रमांक सौ.मयुरी लखन पाबळे, द्वितीय क्रमांक सौ.उर्मिला भगवान काळे, ▶▶ पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26